# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०१६

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**बुधवार, दिनांक २३ मार्च, २०१६ / चैत्र ३, १९३८ ( शके )**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **वित्त आणि नियोजन, वने मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(२)** | **ग्रामविकास आणि जलसंधारण, रोजगार हमी योजना, महिला व बाल विकास मंत्री** | |
| **(३)** | **जलसंपदा मंत्री** | |
| **(४)** | **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - १०१**

---

### सिंदेवाही (जि.चंद्रपूर) तालुक्यातील जंगलामधून जाणाऱ्या रस्त्यांच्या दुरुस्तीच्या प्रस्तावाबाबत

**(१) * ३९७८९ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंदेवाही (जि.चंद्रपूर) तालुक्यातील जंगला मधून जाणाऱ्या रस्त्यांच्या दुरुस्तीकरीता कार्यकारी अभियंता, सा.बा., चंद्रपूर यांनी अधीक्षक अभियंता, सा.बा., चंद्रपूर यांच्यामार्फत दिनांक १३ ऑक्टोबर, २०१५ रोजी उपसंचालक (बफर), ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प, चंद्रपूर यांच्याकडे अंदाजपत्रकासह प्रस्ताव पाठविला असता, सदर प्रस्तावास अंतिम मंजूरी मिळण्याकरीता वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्याकडे दिनांक २७ जानेवारी, २०१६ रोजी पाठविलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देवून निधी उपलब्ध करून देण्याबाबतचे निवेदन लोकप्रतिनिधींनी, दिनांक १२ जानेवारी, २०१६ रोजी मा.वने मंत्री व सचिव, वने विभाग यांना दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रस्तावास शासनाने प्रशासकीय मान्यता दिलेली आहे काय,
(४) असल्यास, या रस्त्यांच्या दुरुस्तीकरीता निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) व (२) होय हे खरे आहे.
(३) व (४) ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पाकडे जाणाऱ्या एकूण ११ पोहच रस्त्यांपैकी महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक:- डब्ल्यूएलपी-०२.१६/प्र.क्र.३६/फ-१, दिनांक ०२.०२.२०१६ अन्वये उपरोक्त ११ पोहच रस्त्यांपैकी २ रस्त्यांच्या दूरुस्तीकरीता रु. ४४७.०० लक्ष निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे. उर्वरित ९ पोहच रस्त्यांच्या दूरुस्तीचा समावेश सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन २०१६-१७ च्या अर्थसंकल्पात करण्याबाबत विनंती करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## काटेपूर्णा नदी (जि.अकोला) प्रकल्पावरील वितरण व्यवस्था पुन:स्थापित करण्याच्या कामाबाबत

**(२) * ४६९५७ श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) काटेपूर्णा नदी (जि.अकोला) प्रकल्पावरील महाराष्ट्र जलक्षेत्र सुधार प्रकल्पाअंतर्गत सहकारी पाणी वापर संस्थेचे कार्यक्षेत्रात वितरण व्यवस्था पुन:स्थापित करण्याच्या कामासाठी, दिनांक २५ नोव्हेंबर, २०१४ रोजी ३८७.५० लक्ष निधी मंजूर केला होता, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त मंजूर केलेल्या निधीचे सन २०१४-२०१५ मध्ये वाटप करण्यात आले नाही तसेच प्रत्यक्षात आजपर्यंत वितरण करण्यात आले नाही, निधी अभावी कंत्राटदाराच्या कामाच्या देयकाचे भुगतान न झाल्याने कंत्राटदारांनी कामे बंद केली आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मंजूर निधी प्रत्यक्षात वितरीत करण्याचे शासनाने काय नियोजन केले आहे,

(४) असल्यास, या प्रकल्पाची कामे सुरु होण्यासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन : (**१) होय.
(२) होय.
(३) व (४) महाराष्ट्र जलक्षेत्र सुधार प्रकल्पाची मुदत दि. २८.०३.२०१४ रोजी संपलेली आहे. त्यानंतर थकीत असलेली देयके अदा करण्यासाठी सक्षम स्तरावर मान्यता घेऊन देयके अदा करावयाची कार्यवाही करण्याचे नियोजन आहे.
(५) मान्यतेनंतर कार्यवाही करण्यात येईल.

-----------------

**रत्नागिरी-कोल्हापूर मार्गावरील मौजे घाटीवळे (जि.रत्नागिरी)**
**येथील रस्त्याची झालेली दुरवस्था**

**(३) * ४८३४२ श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रत्नागिरी-कोल्हापूर मार्गावरील मौजे घाटीवळे (जि.रत्नागिरी) येथील रस्त्याची दुरवस्था झाल्याने वाहन चालकांसह विद्यार्थी व ग्रामस्थांची गैरसोय होत असल्याचे, मौजे घाटीवळे युवा मंडळ, मुंबई यांच्यावतीने जिल्ह्याचे मा.पालकमंत्री यांच्याकडे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गेल्या दोन वर्षापासून जिल्हा परिषद बांधकाम विभाग, रत्नागिरी यांच्याकडे रस्ता दुरूस्त करण्याबाबत मागणी करुनही कोणतीच कार्यवाही केली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू रस्ता दुरूस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) निवेदन प्राप्त आहे.

(२) ते (४) संपूर्ण राज्यामध्ये जिल्हा परिषदांच्या अखत्यारितील ग्रामीण मार्ग व इतर जिल्हा मार्ग रस्त्यांची एकूण लांबी २३६८९०.०४ कि.मी. इतकी असून सदर रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी शासनाकडे उपलब्ध असलेल्या निधीचे वाटप रस्त्यांच्या लांबीच्या प्रमाणात करण्यात येते. त्यानुसार रत्नागिरी जिल्हा परिषदे अंतर्गत ग्रामीण मार्ग व इतर जिल्हा मार्ग रस्त्यांची एकूण लांबी ८०८५.३५ कि.मी. इतकी आहे. रस्ते व पूल, दुरुस्ती व परीरक्षण या कार्यक्रमा अंतर्गत सन २०१२-१३, २०१३-१४ व २०१४-१५ या आर्थिक वर्षासाठी रत्नागिरी जिल्हा परिषदेस एकूण रु.३७३३.८२ लक्ष, तेराव्या वित्त आयोगामध्ये सन २०१२-२०१३, २०१३-१४ व २०१४-१५ मध्ये एकूण रु.७६३.५८ लक्ष तर पूरहानी कार्यक्रमासाठी रत्नागिरी जिल्हा परिषदेला रु.१७००.६३ लक्ष असा एकूण रु.६१९८.०३ लक्ष इतका निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे.

सन २००१-२०२१ रस्ते विकास योजनेनुसार प्रश्नाधिन रस्ता करंजारी मुसलमानवाडी ते घाटीवळी कदमवाडी रस्ता फाट्यासह ग्रामीण मार्ग क्र. ३२ दर्जाचा आहे. सदर रस्त्याची प्रत्यक्षात लांबी ७/२०० कि.मी असून संपूर्ण लांबी डांबरी पृष्ठभागाची आहे.

उपरोक्त रस्त्यांवर एस.टी.वाहतुक सुरु असून सदर रस्त्याच्या खराब लांबीतील रस्ता दुरुस्तीचे काम अर्थसंकल्पात/ रस्ते विशेष दुरुस्ती कार्यक्रमातून उपलब्ध निधी व निकषाच्या अधिन राहून प्रस्तावित करण्याबाबत जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.

-----------------

## सोनापूर (ता.जि.सातारा) या गावास लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) तलाव होण्याच्या मागणीबाबत

**(४) * ४७६०९ श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोनापूर (ता.जि.सातारा) या गावास लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) तलाव होण्याची मागणी मा.जलसंधारण मंत्री यांचेकडे कराड, (जि.सातारा) येथील लोकप्रतिनिधींनी दिनांक १६ नोव्हेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय.

(२) लघु पाटबंधारे तलाव सोनापूर ता.जि.सातारा या योजनेचे सर्वेक्षण पूर्ण करण्यात येवून रु. ६८२.८१ लक्ष किंमतीचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून, लवकरच प्रशासकीय मान्यतेसाठी सादर करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतील रस्त्यांच्या कामांबाबत**

**(५) * ४१८६२ श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री. किसन कथोरे (मुरबाड), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) : तारांकित प्रश्न क्रमांक २८३४८ ला दिनांक ७ डिसेंबर, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंतप्रधान ग्रामसडक योजनेच्या धर्तीवर राज्यात मुख्यमंत्री ग्रामसडक योजना राबविण्याचा निर्णय माहे ऑक्टोबर,२०१५ मध्ये वा त्यादरम्यान शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेमध्ये पहिल्या टप्प्यात किती किलोमीटर लांबीच्या रस्त्यांची कामे करण्यात येणार असून या कामासाठी किती खर्च येणार आहे,

(३) तसेच राज्यातील ग्रामीण भागात दळणवळणाच्या सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी लवकरात लवकर निर्णय घेऊन त्याची अंमलबजावणी करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय.

(२) मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतंर्गत सन २०१५-१६ साठी २००० कि.मी. रस्त्यांची कामे करण्यात येणार असून या कामासाठी अंदाजे ४५ लक्ष प्रति कि.मी. याप्रमाणे रूपये ९००.०० कोटी खर्च येणार आहे.

(३) सन २०१५-१६ मध्ये निवड केलेल्या रस्त्याच्या कामांना शासनाची प्रशासकीय मान्यता देण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**बुलढाणा जिल्हयातील जलयुक्त शिवार योजनेची**
**काम निधी अभावी प्रलंबित असल्याबाबत**

**(६) * ४७७५९ श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाच्या जलयुक्त शिवार या योजनेंतर्गत बुलढाणा जिल्हयात सन २०१५-१६ मध्ये मोठया प्रमाणावर कामे प्रस्तावित करण्यांत आलेली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यापैकी केवळ ३० टक्के कामेच पूर्ण झाली असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर योजनेसाठी निधी उपलब्ध नसल्यामुळे ही कामे प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या जिल्हयातील जलयुक्त शिवार योजनेंतर्गत करण्यात येत असलेली कामे पूर्ण करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

जळगाव जिल्हयात जलयुक्त शिवार अभियानांतर्गत रू.५५.६९ कोटी निधी शिल्लक आहे.

(४) व (५) जलयुक्त शिवार अभियानांतर्गत विविध स्त्रोतांद्वारे जिल्हयास निधी प्राप्त झाला आहे. सदर निधीमधून माहे फेब्रुवारी, २०१६ अखेर ४९४० कामे पूर्ण करण्यात आली असून सद्यस्थितीत ३०७ कामे प्रगतीपथावर आहेत.

सदर अभियानातून मृद संधारणाच्या विविध १६८५ कामांना प्रशासकिय मान्यता प्रदान करण्यात आली असून सदरची कामे ई- निविदा प्रक्रियेत आहेत.

-----------------

## राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेतील काही रुग्णालयांनी रुग्णांकडून अतिरिक्त पैसे घेतल्याबाबत

**(७) * ४१५७६ श्री.धनजंय (सुधीर) गाडगीळ (सांगली) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेतील काही रुग्णालयांनी रुग्णांकडून अतिरिक्त पैसे घेतल्याच्या घटना माहे डिसेंबर २०१५ च्या अखेरीस निदर्शनास आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रुग्णांचे पैसे रुग्णालयांनी त्यांना त्वरीत परत करण्याबाबतच्या सूचना या योजनेच्या समन्वयक असलेल्या नॅशनल इन्शुरन्स कंपनीने दिल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, तद्नुसार दोषी व्यक्तीविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व याबाबतची सद्य:स्थिती काय आहे ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) होय.

(२) होय.

(३) योजनेंतर्गत डिसेंबर, २०१५ अखेर अतिरिक्त पैसे घेतल्याच्या तक्रारींच्या अनुषंगाने चौकशी करुन आतापर्यंत ३ अंगीकृत रुग्णालयांचे निलंबन करण्यात आले असून ३ रुग्णालयांची मान्यता रद्द करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**ग्रामीण रुग्णालयातील (ता.केज) डॉक्टर व कर्मचाऱ्यांसाठी निकृष्ट दर्जाची निवासस्थान बांधल्याबाबत**

**(८) * ५१५०६ श्रीमती संगीता ठोंबरे (केज) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केज तालुक्यातील नांदूरघाट परिसरातील रुग्णांच्या आरोग्याकरिता गेल्या दोन वर्षापूर्वी पाच एकर जागेमध्ये लाखो रुपये खर्चून ग्रामीण रुग्णालयाची नवी इमारत बांधण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याच परिसरात रुग्णालयातील डॉक्टर व कर्मचाऱ्यांना दहा निवासस्थाने औरंगाबाद येथील एका गुप्तेदाराने बांधली परंतु या निवासस्थानांचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे झालेले असून, तेथे कोणतीही सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या निवासस्थानांचे रुग्णालयाला हस्तांतरण न केल्याने डॉक्टर व कर्मचारी गावात व गावाबाहेर वास्तव्य करत असल्यामुळे रुग्णांना सेवा देण्यास अडचणी येत आहेत, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर निवासस्थानातील अपूर्ण कामे पूर्ण करुन डॉक्टर व कर्मचाऱ्यांना जागा उपलब्ध करुन देण्यात यावी व सदर इमारतीत झालेल्या गैरप्रकारांची दखल घेऊन संबंधितांवर कारवाई करण्याची मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे आहे.

(२), (३), (४) व (५) अंशत: खरे आहे.

सदर दहा निवासस्थानाचे बांधकाम सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत करण्यात आले असून, त्यात काही त्रुटी आढळून आल्या आहेत. इमारतीच्या मुख्य बांधकामाव्यतिरिक्त इतर सोयी सुविधा उपलब्ध करुन घेण्याची कार्यवाही चालू आहे. तद्नंतर निवासस्थाने ताब्यात घेऊन तेथे डॉक्टर व कर्मचारी यांना राहण्यासाठी उपलब्ध करुन देण्यात येईल.

तथापि रुग्णसेवा वेळेवर देण्यात येत आहे.

सदर इमारत बांधकामात गैरप्रकार झाल्याचे निदर्शनास आले नाही.

अपुर्ण कामे पुर्ण करुन देण्याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागास कळविण्यात आले आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**कोयना धरण प्रकल्प (ता.पाटण, जि.सातारा) येथे भूकंपाच्या नोंदी घेण्यासाठी अत्याधुनिक यंत्रणा कार्यान्वीत करण्याबाबत**

**(९) * ४११९० श्री.शंभूराज देसाई (पाटण) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाटण (जि.सातारा) तालुक्यातील कोयना धरण प्रकल्पात भूकंपाच्या नोंदी घेण्यासाठी अत्याधुनिक यंत्रणा कार्यान्वीत नसल्याने भूकंपाची माहिती लवकर उपलब्ध होत नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोयना धरणाच्या दुरुस्ती व सुरक्षिततेकरीता शासन प्रतिवर्षी अर्थसंकल्पामध्ये कोट्यवधी रुपयांची तरतूद करते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, भूकंपाच्या नोंदी तातडीने समजण्याकरीता अत्याधुनिक यंत्रणा कार्यान्वीत करण्याची मागणी कोयना धरण व्यवस्थापनाकडून होत असताना यावर शासन कोणताही निर्णय घेत नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, यासंबंधी शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीअंती काय आढळून आले,

(५) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) नाही. सन २००९ मध्ये प्रकल्पाचे कक्षेतील भूकंप मापन केंद्रामध्ये आधुनिक यंत्रणा कार्यान्वित करणेत आली आहे. कोयना नगर, सातारा व कोल्हापूर येथील कार्यरत आधुनिक यंत्रामुळे भूकंपाची माहिती त्वरीत मिळते. मात्र, महाबळेश्वर व रत्नागिरी येथील डिजीटल सेसमॉमिटर व कोयना नगर येथील कम्युनिकेशन मोड्युल मध्ये बिघाड झाला आहे.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) व (५) महाबळेश्वर, रत्नागिरी डिजीटल सेसमॉमिटर मध्ये बिघाड झाला आहे. दुरुस्तीची कार्यवाही प्रगतीत आहे.

-----------------

## रोजगार हमी योजनेंतर्गत नियुक्त करण्यात आलेल्या हजेरी सहाय्यकांना शासन सेवेत सामावून घेण्याबाबत

**(१०) * ४६३८५ ॲड.संजय धोटे (राजूरा), श्री.नानाजी शामकुळे (चंद्रपूर) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील रोजगार हमी योजनेअंतर्गत प्रत्येक जिल्हयात नियुक्त करण्यात आलेल्या हजेरी सहाय्यक यांना शासन सेवेत सामावून घेण्याची मागणी मागील २० वर्षापासून सुरु असल्याचे माहे डिसेंबर, २०१५ च्या तिसऱ्या आठवडयात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील ३०२ हजेरी सहाय्यक यांनी शासनाकडे याबाबत वेळोवेळी निवेदन केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या निवेदनाच्या अनुषंगाने या हजेरी सहाय्यकांना सेवेत सामावून घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) व (२) रोजगार हमी कार्यरत हजेरी सहाय्यक संघटना, महाराष्ट्र यांचे डिसेंबर, २०१४ चे निवेदन प्राप्त झाले आहे.

(३) व (४) निवेदनामध्ये प्रामुख्याने सुधारीत वेतनश्रेणी मिळणे व शासन सेवेत सामावून घेण्यात यावे अशा मागण्या होत्या.

मात्र जे हजेरी सहाय्यक दिनांक २६.०५.१९९३ ते ३१.०५.१९९३ या कालावधीत रोजगार हमी योजनेच्या कामावर प्रत्यक्षात कार्यरत होते अशा हजेरी सहाय्यकांना शासन सेवेत सामावून घेण्यात आले आहे. निवेदनात उल्लेखित हजेरी सहाय्यक दिनांक २६.०५.१९९३ ते ३१.०५.१९९३ या कालावधीत रोजगार हमी योजनेच्या कामावर प्रत्यक्षात कार्यरत नसल्याने, शासनाच्या प्रचलित धोरणानुसार त्यांना शासन सेवेत सामावून घेण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. याव्यतिरिक्त मा.सर्वोच्च न्यायालयाने मागील दाराने (Back Door) भरती करण्यात येऊ नये या दिलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक

१९.११.२००३ व दिनांक २५.०८.२००५ च्या परिपत्रकान्वये सूचना देण्यात आल्या आहेत. त्याअनुषंगाने हजेरी सहाय्यकांना शासन सेवेत सामावून घेता येणार नाही.

मात्र निवेदनातील अन्य मागणीच्या अनुषंगाने सध्या रोजगार हमी योजनेअंतर्गत न्यायनिर्णयानुसार कार्यरत हजेरी सहाय्यकांच्या वेतन श्रेणीत सुधारणा करण्याचा निर्णय दिनांक ११.०३.२०१६ च्या शासन निर्णयान्वये घेण्यात आला आहे.

-----------------

## राज्यस्तरीय निविदा अंतिम झाल्याशिवाय जिल्हास्तरावर औषधे खरेदी करता येणार नसल्याच्या निर्णयाबाबत

**(११) * ४०७२९ श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.नितेश राणे (कणकवली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यस्तरीय निविदा अंतिम झाल्याशिवाय जिल्हास्तरावर औषधे खरेदी करता येणार नसल्याचा निर्णय शासनाने घेतल्यामुळे राज्याच्या २०३ निविदा प्रलंबित असून त्यामुळे औषधांचा तुटवडा निर्माण झाला असल्याची बाब माहे डिसेंबर २०१५ मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच शासनाने केंद्रिय ई-निविदा पध्दत लागू केल्यामुळे मराठवाडयासह संपूर्ण राज्यात औषधांचा तुटवडा भासत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जिल्हा परिषद व सामान्य रूग्णालयाकडे जिल्हा वार्षिक योजनेत दिले जाणारे कोटयवधी रूपये एकीकडे पडून आहेत तर प्राथमिक आरोग्य केंद्र, उपकेंद्र, सामान्य ग्रामीण रूग्णालयाच्या बाहयरूग्ण विभागात सर्दी, खोकल्याच्या औषधांचा तुटवडा निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय

(४) असल्यास, राज्यातील रूग्णालयात औषधांचा तुटवडा विनाविलंब दूर करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

सद्यस्थितीत जिल्हास्तरावर पुरेसा औषधसाठा उपलब्ध आहे.

तसेच जिल्हास्तरावरील तातडीची औषधे व औषधी साहित्याची गरज भागविण्यासाठी स्थानिकरित्या खरेदी करण्याबाबत आरोग्य सेवा संचालनालयाच्या दिनांक ११.०२.२०१३ व दिनांक २१.०१.२०१६ च्या पत्रान्वये मार्गदर्शक सुचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**झिका आजाराच्या प्रतिबंध आणि नियंत्रणासाठी करावयाच्या उपाययोजना**

**(१२) * ४६५७८ श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), डॉ.अनिल बोंडे (मोर्शी), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.राज पुरोहित (कुलाबा), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नविन झिका विषाणूने अमेरिका व आफ्रिका देशात कहर केल्यानंतर हा विषाणू भारतात येण्याची शक्यता निर्माण झाली असून, यावरील उपाययोजना आणि जनजागृती बाबत दिनांक २८ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास महाराष्ट्र रजिस्टर्ड फार्मासिस्ट असोसिएशन, पुणे यांनी मा.सार्वजनिक आरोग्य मंत्री यांना लेखी पत्राद्वारे सुचित केले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या आजाराच्या प्रभावी प्रतिबंध, उपाययोजना व जनजागृती याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे नाही.

(२) झिका आजार ही सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने आंतरराष्ट्रीय आपत्ती असल्याचे जागतिक आरोग्य संघटनेने दि. १.०२.२०१६ रोजी घोषित केले त्यानंतर या आजराच्या प्रभावी प्रतिबंध आणि नियंत्रणासाठी खालील उपाययोजना करण्यात आल्या व येत आहेत.

- दि. ०४/०२/२०१६ रोजी महाराष्ट्र साथरोग प्रतिबंध व नियंत्रण तांत्रिक समितीची बैठक घेण्यात येऊन यामध्ये राज्य शीघ्र प्रतिसाद पथकासह सर्व संबंधितांना झिका आजार नियंत्रण व प्रतिबंध या संदर्भात मार्गदर्शन करण्यात आले.
- झिका आजार प्रतिबंध व नियंत्रण संदर्भातील मार्गदर्शक सूचना सर्व संबंधितांना निर्गमित करण्यात आल्या.
- सर्व जिल्हा शीघ्र प्रतिसाद पथकांची झिका संदर्भात व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे कार्यशाळा .
- ताप रुग्ण सर्वेक्षण.
- डोक्याचा घेर कमी असणाऱ्या बालाकांचे (मायक्रोसिफॅली) सर्वेक्षण
- राष्ट्रीय विषाणू विज्ञान संस्था, पुणे येथे झिका आजार निदानाची सुविधा. एकात्मिक किटक व्यवस्थापन.
- विमानतळांवर किटकशास्त्रीय सर्वेक्षण.
- आंतरराष्ट्रीय प्रवाशांचे आरोग्य शिक्षण.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**नांदेड जिल्हा परिषदेत कंत्राटी ग्रामसेवक भरतीच्या परीक्षेत झालेला गैरप्रकार**

**(१३) * ४९७३२ डॉ.तुषार राठोड (मुखेड) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्हा परिषदमध्ये कंत्राटी ग्रामसेवक भरतीच्या परीक्षेत परीक्षा केंद्रावर परीक्षार्थीला कॉपी पुरविण्याची गंभीर घटना घडली असल्याचे माहे डिसेंबर, २०१५ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कॉपी पुरविण्याऱ्यास परीक्षा केंद्रावर येण्यास परीक्षा केंद्र प्रमुख यांनी मज्जाव न करता सहकार्य केले असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय व चौकशीअंती काय आढळून आले,
(४) असल्यास, तद्नुसार शासनाने दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय.
(२) हे खरे नाही. सदर पदाची परीक्षा दि.२ डिसेंबर, २०१५ रोजी सकाळी १०.०० ते ११.३० या सत्रात आयोजित करण्यात आली होती.

परीक्षा संपल्याची घंटा वाजविल्यानंतर एका उमेदवारास कॉपी देण्यात आली अशी तक्रार परीक्षेची वेळ संपल्यानंतर काही उमेदवारांनी केंद्र प्रमुखाकडे केली.
(३), (४) व (५) या प्रकरणाची चौकशी उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य) जिल्हा परिषद नांदेड योनी केली. या चौकशीत सदर केंद्रावर ग्रामसेवक श्री.पी.डी. उबाळे, पंचायत समिती नांदेड यांनी एका उमेदवारास कॉपी देण्यासाठी विनापरवानगी परीक्षा केंद्रावर प्रवेश मिळवला असल्याचे निष्पण झाल्याचे श्री.पी.डी. उबाळे यांना दिनांक ५/१२/२०१५ च्या आदेशान्वये सेवेतून निलंबीत करण्यात आलेले आहे.

-----------------

## अमरावती जिल्हयातील सिंचन क्षमता वाढविण्याकरीता आवश्यक मनुष्यबळ पुरविण्याबाबत

**(१४) * ४८०५२ ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमरावती जिल्हयातील १ मोठा, ४ मध्यम व ७४ लघु असे एकूण ७९ प्रकल्प असताना १५ उप व ५० कनिष्ठ अभियंत्यांच्या जबाबदारीवर सिंचनाचे व्यवस्थापन सुरु आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अमरावती जिल्हयातील जलसंपदा विभागाच्या मुनष्यबळाच्या अभावी सिंचनव्यवस्था कोलमडली असल्याचे, माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अमरावती जिल्हयातील सिंचन क्षमता वाढविण्याकरीता आवश्यक मनुष्यबळ पुरविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) अमरावती जिल्हयात २ मोठे, ९ मध्यम व ९७ लघू असे एकुण १०८ प्रकल्प आहेत. त्यापैकी एक मोठा, ४ मध्यम व ६९ लघुपाटबंधारे असे एकुण ७४ प्रकल्प सिंचन व्यवस्थापन विभागाकडे हस्तांतरीत झाले आहेत. त्यासाठी जिल्हयात ६ कार्यकारी अभियंता, ५६ उप अभियंता व १७९ शाखा अभियंता अशी एकुण २३१ पदे मंजूर आहेत. सध्या त्यापैकी, ५ कार्यकारी अभियंता, ४५ उप अभियंता व १२४ शाखा अभियंता अशी एकुण १७४ पदे कार्यरत आहेत

(२) व (३) अमरावती जिल्हयात मनुष्यबळा- अभावी सिंचनव्यवस्था कोलमडलेली नाही. सिंचन व्यवस्थापन विभागातील रिक्त पदे भरण्याबाबतची कार्यवाही प्रगतीत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## औरंगाबाद जिल्हा परिषदेच्या सिंचनाच्या कामांमध्ये झालेला गैरव्यवहार

**(१५) * ४९०२९ श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व), श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद जिल्हा परिषदने सन २०१२ मध्ये सिंचन कामासाठी केलेल्या कोट्यवधी खर्चातील आर्थिक गैरव्यवहाराचे प्रकरण नुकतेच निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर सिंचन गैरव्यवहार प्रकरणी चौकशी केली आहे काय व चौकशीअंती काय आढळून आले,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) नाही.

(२) या प्रकरणी चौकशी करण्यात आली असून मूळ अंदाजपत्रकात आवश्यक व परिपूर्ण तरतूदी न ठेवल्यामुळे अंदाजपत्रके सुधारीत करावी लागली, असे चौकशीमध्ये आढळून आले.

(३) सदर अनियमितते प्रकरणी विभागीय चौकशीअंती संबंधित कनिष्ठ अभियंता/शाखा अभियंता यांच्या वेतनवाढी १ ते २ वर्षाकरिता तात्पुरत्या स्वरुपात बंद करण्याची शिक्षा देण्यात आली आहे. तसेच संबंधित उपअभियंता व कार्यकारी अभियंता यांच्या विरुध्द विभागीय चोकशी प्रस्तावीत करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## आलेवाडा (ता.देवरी, जि.गोंदिया) ग्रामपंचायत येथे रोजगार हमी योजनेच्या कामात झालेला गैरव्यवहार

**(१६) * ४८११३ श्री.संजय पुराम (आमगाव) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आलेवाडा ग्रामपंचायत (ता.देवरी, जि.गोंदिया) येथील सन २०१५ चे महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेतंर्गत विहिरीचे काम कंत्राटी पध्दतीने करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर काम पूर्ण झाले असून त्या कामासाठी ९ मजूर काम करीत होते परंतु २३ मजूर दाखविण्यात आले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय व चौकशीअंती काय आढळून आले,

(४) असल्यास, त्यानुसार दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) नाही

(२) नाही.

(३) प्रस्तुत प्रकरणी ग्रामपंचायत आलेवाडा ता. देवरी, जि. गोंदिया येथील मग्रारोहयो अंतर्गत सन २०१५ मध्ये केलेल्या विहीरीचे कामा संदर्भात

लोकप्रतिनिधीं कडून सूचना प्राप्त झाली होती. सदर सूचनेच्या अनुषंगाने विहीर बांधकामांची चौकशी तहसिलदार देवरी यांचे मार्फत करण्यात आली.

चौकशीअंती सदर विहीरीचे खोदकाम व बांधकाम मग्रारोहयो अंतर्गत नियमानुसार करण्यात आल्याचे अहवालात नमूद केले आहे. त्यामुळे चौकशीत काही तथ्य आढळून आले नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील (मालाड पूर्व, मुंबई) आदिवासींना नळजोडणीकरीता 'ना-हरकत' प्रमाणपत्र मिळण्याबाबत

**(१७) * ४४२४७ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई उपनगर मालाड पूर्व, येथील संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या वन जमिनीवर अनेक वर्षापासून वास्तव्य करीत असलेल्या, आदिवासी पाड्यातील शेकडो कुटुंबियांना विभागाकडून नळजोडणीकरीता "ना-हरकत" प्रमाणपत्र न मिळाल्याने पिण्याच्या पाण्याची प्रचंड गैरसोय होत असल्याची बाब निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आदिवासी वन निवासी अधिनियम २००६ मधील कलम ३ व पोटकलम २ मधील तरतूदीनुसार आदिवासींना नळजोडणीकरीता "ना-हरकत" प्रमाणपत्राची मागणी करणारे निवेदन लोकप्रतिनिधींनी मा.मंत्री महोदयांना दिनांक ७ डिसेंबर, २०१५ रोजी दिले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू आदिवासींना त्वरीत ना-हरकत प्रमाणपत्र देण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) हे खरे नाही.

(२) होय हे खरे आहे.

(३) संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील अतिक्रमणाबाबत मा. उच्च न्यायालयात दाखल याचिका क्रमांक ३०५/९५ मध्ये मा. न्यायालयाने पारित केलेल्या आदेशानुसार कोणत्याही नवीन सुविधा निर्माण करण्यासाठी परवानगी देता येत नसल्याने ना-हरकत प्रमाणपत्र देण्याच्या दृष्टीने कार्यवाही करण्यात आली नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

**'पीसीपीएनडीटी' कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या डॉक्टरांविरुद्ध कारवाई करण्याबाबत**

**(१८) * ४९३८२ श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण), श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य), श्री.राज पुरोहित (कुलाबा), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.योगेश सागर (चारकोप), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.बाळासाहेब सानप (नाशिक पूर्व) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गभर्लिंग निदान चाचणी हा कायद्याने गुन्हा असून राज्यातील ६२ डॉक्टरांनी पीसीपीएनडीटी कायद्याचे उल्लंघन केल्याचे माहे जानेवारी २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सोनोग्राफी मशीन्सचा गैरवापर, एफ फॉर्मची पूर्तता न करणे, फॉर्ममध्ये आवश्यक माहिती देण्यासंदर्भात त्रुटी ठेवणे, महिलेची नावनोंदणी न करणे, मशीन एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी नेण्याचा प्रयत्न करण्यासंदर्भात या डॉक्टरांविरोधात तक्रारी नोंदविण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर डॉक्टरांचा वैद्यकीय परवाना रद्द करण्याचे निर्देश महाराष्ट्र मेडिकल कौन्सीलने दिले आहेत काय, हे ही खरे आहे काय

(४) असल्यास, किती डॉक्टरांच्या विरोधात आतापर्यंत कारवाई करण्यात आली आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) राज्यातील ६२ डॉक्टरांनी पीसीपीएनडीटी कायद्याचे उल्लंघन केल्याचे माहे जानेवारी,२०१६ च्या सुमारास उघडकीस आले हे खरे नाही. तथापि, पीसीपीएनडीटी कायद्याचे उल्लंघन केल्याचे समुचित प्राधिका-यांच्या प्रथमदर्शनी निदर्शनास आल्यामुळे सन २००२ पासून माहे फेब्रुवारी, २०१६ अखेर एकुण ५५२ केंद्रांच्या डॉक्टरांविरुध्द कोर्ट केसेस दाखल करण्यात आलेल्या आहेत.

(२) होय, हे खरे आहे. सोनोग्राफी केद्र नोंदणीकृत नसणे, अभिलेख पूर्ण नसणे, जाहिरात करणे, डिकॉय केसेस व इतर कारणांसाठी मिळून सन २००२ पासून फेब्रुवारी,२०१६ अखेर एकूण ५५२ कोर्ट केसेस दाखल झालेल्या आहेत.

(३) व (४)  होय, हे खरे आहे.

उपरोक्तप्रमाणे दोषारोप दाखल झालेल्या डॉक्टरांचे परवाने रद्द करण्यासाठी १५५ प्रकरणे महाराष्ट्र मेडिकल कौन्सीलला दिले आहेत.

यापैकी ५० डॉक्टरांचे परवाने निलंबित करण्यात आले आहेत,४९ डॉक्टरांना ताकिद देण्यात आलेली आहे. ७ डॉक्टरांचे परवाने रद्द करण्यात आलेले आहेत. ११ डॉक्टरांची न्यायालयात निर्दोष मुक्तता झाली आहे. १ डॉक्टरचा मृत्यू झाला आहे. १ डॉक्टरचे प्रमाणपत्र बनावट आढळून आले आहे. ६ डॉक्टरांना सल्ला देण्यात आलेला आहे. ३० प्रकरणे प्रलंबित आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**जननी सुरक्षा योजनेंतर्गत वाटप करण्यात आलेले धनादेश वटले नसल्याबाबत**

**(१९) * ३९७३६ श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हेरवाड (ता.शिरोळ, जि.कोल्हापूर) येथील आरोग्य उपकेंद्राअंतर्गत ५५ लाभार्थ्यांना जननी सुरक्षा योजनेअंतर्गत वाटप करण्यात आलेले धनादेश वटले नसल्याची बाब माहे जानेवारी २०१६ च्या तिसऱ्या आठवड्यात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर आरोग्य उपकेंद्राच्या बँक खात्यातून कर्मचाऱ्यांनी रक्कम काढल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीत काय निष्पन्न झाले त्याअनुषंगाने कोणती कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे,

(४)  नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे अंशतः खरे आहे.

सन २०१४-१५ मध्ये हेरवाड (ता.शिरोळ, जि.कोल्हापूर) येथील आरोग्य उपकेंद्रांतर्गत जननी सुरक्षा योजनेंतर्गत ५५ लाभार्थ्यांपैकी ६ लाभार्थ्यांना देण्यात आलेले ७ धनादेश वटले आहेत. लाभार्थींच्या नावे दिलेले सर्व ७ धनादेश वटले आहेत.

धनादेश दिलेल्या ६ लाभार्थ्यांपैकी एका लाभार्थीच्या नावे २ धनादेश काढण्यात आलेले आहेत. उर्वरीत ४९ लाभार्थींना धनादेश दिलेले नाहीत.

(२) हे खरे आहे.

धनादेश दिलेल्या लाभार्थ्यांपैकी एका लाभार्थ्यांच्या नावे २ धनादेश दिले. त्यापैकी एका धनादेशाची रक्कम लाभार्थीला मिळाली असून दुस-या धनादेशाची रक्कम सदर उपकेंद्राच्या आरोग्य सेविकेने स्वत: काढली असल्याचे आढळून आले. तसेच सदर आरोग्य सेविकेने उपकेंद्राच्या बँक खात्यावर स्वत: रक्कम रू.२७,०००/- जमा केल्याचे व १४ धनादेशांद्वारे रू.४८,७५०/- स्वत: काढल्याचे आढळून आले आहे.

(३) होय.

सदर प्रकरणाची चौकशी केली असून चौकशी अहवालामध्ये संबंधित कर्मचारी दोषी असल्याचे आढळून आले आहे. त्यांचे विरूध्द जिल्हास्तरावर प्रशासकीय कारवाई प्रस्तावित करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## रुग्णांची आर्थिक पिळवणूक करणाऱ्या खासगी डायलेसिस सेंटरवर कारवाई करण्याबाबत

**(२०) * ४४९२७ श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात खासगी डायलेसिस सेंटरमधून रुग्णांची होणारी आर्थिक पिळवणूक व योग्य उपचार मिळत नसल्याने नोंदणी नसलेल्या तसेच आरोग्य सेवेचे उल्लंघन करणाऱ्या या सेंटरवर कारवाई करण्यासाठी येत्या तीन महिन्यात धोरण निश्चित करण्यात येणार असल्याचे शासनाने जाहीर केले असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त धोरणाची रुपरेषा ठरविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे आहे.

धोरण निश्चित करण्याची कार्यवाही आरोग्य विभागामार्फत चालू आहे.

(२) डायलेसिस केंद्राच्या कार्यप्रणाली बाबतच्या मार्गदर्शक सुचना निर्गमित करण्याची कार्यवाही चालू आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मठजळगाव (ता.अंबड, जि.जालना) येथे रोजगार हमी योजनेच्या कामात झालेला गैरव्यवहार**

**(२१) * ४७३४५ श्री.अर्जुन खोतकर (जालना) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मठजळगाव (ता.अंबड, जि.जालना) येथील महात्मा गांधी रोजगार हमी योजनेच्या कामात लाखो रुपयांचा गैरव्यवहार झाला याबाबतची तक्रार तेथील गावकऱ्यांनी मागील सात महिन्यांपासून सातत्याने जिल्हाधिकारी यांच्याकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तक्रारी करुनही याची चौकशी करण्यास टाळाटाळ करण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(४) असल्यास, चौकशीनुसार शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय, हे खरे आहे.

(२), (३) व (४) सदर तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक २३.६.२०१५ रोजी उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पं), जिल्हा परिषद, जालना यांची चौकशी अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात आली असून चौकशी सुरू आहे.

सदर प्रकरणी सद्यस्थितीत उपअभियंता बांधकाम उप विभाग, अंबड यांच्यामार्फत कामाची मोजणी सुरू असून चौकशी अहवाल प्राप्त झाल्यावर पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## गडचिरोली जिल्हा परिषदेला विकास कामांसाठी दिलेल्या निधीचा अपहार झाल्याबाबत

**(२२) * ५१४७५ डॉ.देवराव होळी (गडचिरोली) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचिरोली जिल्हा परिषदेला विकासाच्या नावावर मोठ्या प्रमाणावर निधी प्राप्त होतो, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्राप्त निधीतून दरवर्षी मोठ्या प्रमाणावर निधी अखर्चित राहतो, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अधिकारी, कर्मचारी व कंत्राटदार यांनी संगनमताने निधी खर्च न करता निधीचा अपहार केलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, निधी अखर्चित ठेवून निधीचा अपहार करणाऱ्या दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय.

सन २०१४-१५ या आर्थिक वर्षात रु.१५३७७.७९ लक्ष इतका निधी तसेच सन २०१५-१६ मध्ये रु.१०५५९.७० लक्ष इतका निधी प्राप्त झाला आहे.

(२) सन २०१४-१५ या वित्तीय वर्षात रु.१५३७७.७९ लक्ष इतका निधी प्राप्त झाला होता. त्यापैकी रु.६६२०.६२ लक्ष इतका निधी त्या वित्तीय वर्षात खर्च झालेला आहे. वित्त विभाग शासन निर्णय दि. ०६ जुन, २००८ च्या तरतुदीनुसार पुढील वर्षी निधी खर्च करण्याची परवानगी असल्याने सन २०१५-१६ या वित्तीय वर्षात रु.५७६२.६२ लक्ष इतका निधी खर्च करण्यात आला आहे. उर्वरित निधी मार्च, २०१६ अखेर खर्च होणार असल्याचे नियोजन केले आहे. तसेच सन २०१५-१६ मध्ये रु.१०५५९.७० लक्ष इतक्या प्राप्त निधीपैकी रु.३३२३.१३ लक्ष इतका खर्च झाला असून उर्वरीत निधी खर्च करण्याबाबतचे नियोजन झाले आहे.

(३) नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अहमदनगर जिल्हा परिषदेकडून खरेदी केलेल्या झेरॉक्स मशिनचे अद्याप वाटप न झाल्याबाबत

**(२३) * ४१६१२ श्री.विजय औटी (पारनेर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर जिल्हा परिषदेच्या समाजकल्याण विभागातून गरीब अपंगांना रोजगारासाठी झेरॉक्स मशिन खरेदी करण्याचा निर्णय सन २०१५ मध्ये घेतला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी नियोजित ४७ लाखांच्या निधीतून १२३ झेरॉक्स मशिन खरेदी केल्याचे दिनांक ३ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, समाजकल्याण विभागाने पात्र उमेदवारास झेरॉक्स मशिनीचे अद्याप वाटप केले नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार लाभधारक अपंगांना सदरहू यंत्रे मिळण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय.

(२) होय.

(३) होय,

समाजल्याण समितीने एकूण ५० लाभार्थ्यांची निवड केली असून सदर लाभार्थ्यांच्या याद्या, झेरॉक्स मशिन वितरित करण्यासाठी गट विकास अधिकारी यांचेकडे पाठविण्यात आल्या अहेत. उर्वरित ७३ लाभार्थ्यांची निवड जिल्हा समाजकल्याण समितीच्या बैठकीत करण्यात येत असून सर्व लाभार्थ्यांना मार्च २०१६ पुर्वी झेरॉक्स मशिनचे वाटप करण्यांत येणार आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पालघर जिल्हा परिषदेच्या अंतर्गत असलेला मासवण-काटाळे-नागझरी या रस्त्याची झालेली दुरवस्था

**(२४) * ४१६३३ श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्हा परिषदेच्या अंतर्गत असलेला मासवण-काटाळे-नागझरी या जवळपास ९ कि.मी.च्या रस्याची दुरवस्था झालेली असून रस्त्यावरील खड्यात पडून अनेक अपघात झालेले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सध्या या रस्त्यासाठी १ कोटी १५ लाखांचा निधी मंजूर असूनही रस्त्याचे काम अदयापी सुरु करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीअंती काय आढळून आले आहे,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने शासनाने याप्रकरणी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही. रस्ता वाहतुकीस सुस्थितीत आहे.

(२) जिल्हा परिषद पालघरकडे सदर रस्त्यासाठी १ कोटी १५ लाखांचा निधी मंजूर नसून सार्वजनिक बांधकाम विभाग पालघरकडे सदरचा निधी मंजूर आहे.

रस्त्याच्या एकूण लांबीपैकी २.१० कि.मी. रस्त्याचे रु. ५०.०० लक्ष किमतीचे काम मार्च २०१४ च्या अर्थसंकल्पात मंजूर असून प्रगतीपथावर आहे. मार्च २०१५ च्या अर्थसंकल्पात ७०० मीटर लांबीच्या रुंदिकरणाचे रु.४०.०० लक्ष किमतीचे काम मंजूर असून निविदा स्तरावर आहे. तसेच ६०० मीटरच्या रुंदिकरणाचे रु. ३५.०० लक्ष किमतीचे काम जुलै २०१५ च्या अर्थसंकल्पात मंजूर असून निविदा स्तरावर आहे. वरील कामे मे २०१६ मध्ये पूर्ण करण्याचे सार्वजनिक बांधकाम विभागाचे नियोजन आहे.

(३) ते (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कोल्हापूर जिल्ह्यातील संगणक परिचालकांना सेवेत घेण्याबाबत

**(२५) * ४५३०६ डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्ह्यातील ग्रामपंचायतीमध्ये संगणकीय ग्रामीण महाराष्ट्र तथा संग्राम योजनेतून शासनाने ग्रामपंचायतींचा कारभार ऑनलाईन करण्यासाठी महाऑनलाईन कंपनीमार्फत केलेला करार दिनांक ३१ डिसेंबर,२०१५ रोजी वा त्यासुमारास संपल्याने ग्रामपंचायतीचा कारभार ऑफलाईन झाल्यामुळे कोल्हापूर जिल्ह्यातील ११०० संगणक परिचालक यांना उक्त दिनांकापासून सेवा समाप्तीच्या नोटीसा लागू केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संगणक परिचालकांची सेवा समाप्ती करण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, सदरचा ऑनलाईन करार पुन्हा करण्याबाबत व या संगणक परिचालकांना पुन्हा कामावर घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) व (२)

१३ व्या वित्त आयोगाच्या निधीतून ई-पंचायत/संग्राम प्रकल्पाची अंमलबजावणी करण्यात येत होती. १३ व्या वित्त आयोगाची मुदत संपुष्टात आल्याने या प्रकल्पाची अंमलबजावणी यंत्रणा असलेल्या महाऑनलाईन कंपनीने या प्रकल्पासाठी नियुक्त केलेल्या संगणक परिचालक (VLE) यांचा सेवा करार दि. ३१ डिसेंबर, २०१५ पासुन समाप्त केला आहे.

(३) व (४) या प्रकल्पाचे अंमलबजावणीचे सुधारित धोरण लवकरच अपेक्षित आहेत.

----------------

## आष्टी (जि.बीड) तालुक्यातील जलयुक्त शिवार योजनेच्या कामांबाबत

**(२६) * ५०१९५ अॅड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आष्टी (जि.बीड) विधानसभा मतदारसंघातील सुमारे १०० गावांमध्ये जलयुक्त शिवार योजना राबविण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या गावांत सदरहू योजनेच्या कामांची सद्यस्थिती काय आहे,
(३) असल्यास, सदरहू योजनेच्या कामांना गती देऊन ती तातडीने पूर्ण करण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय, हे खरे आहे.
(२) जलयुक्त शिवार योजने अंतर्गत निवडलेल्या ६४ गावात ९२९ कामे पूर्ण झाली असून २११ कामे नियोजित आहेत.
(३) जलयुक्त शिवार अभियानातील कामांसाठी विशेष निधी, गॅप फंडिंग व इतर योजनेच्या अभिसरणातून निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यात रक्त चाचण्यांचे किट्स व यंत्रसामुग्रीवर आकारण्यात येणारा कर कमी करण्याबाबत**

**(२७) * ५०२०९ श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासकीय ब्लडबँकांना रक्त चाचण्यांचे किटस व यंत्रसामुग्रीवर कर सवलत देण्यात येत असून खासगी ब्लडबँकांना सदर किट्स व यंत्रसामुग्रीवर मोठा कर आकारण्यात येत असल्याची बाब माहे फेब्रुवारी, २०१६ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, खासगी ब्लडबँकाना सदर किट्स व यंत्रसामुग्री कर सवलत मिळाल्यास रक्त चाचणीचे दर कमी होऊ शकतात, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, खासगी ब्लडबँकांना सदर किट्स व यंत्रसामुग्रीवर आकारण्यात येणारा कर कमी करण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१), (२), (३) व (४) हे खरे नाही, शासकीय तसेच खाजगी रक्त पेढ्यांना कोणतीही कर सवलत दिली जात नाही.

-----------------

## मराठवाड्यातील जायकवाडी धरणात सोडण्यात आलेल्या पाण्याचा वाटेतच झालेला अपव्यय

**(२८) * ५०३१२ श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक आणि अहमदनगर जिल्ह्यातील धरणांतून मराठवाड्यातील जायकवाडी धरणात सोडण्यात आलेल्या निळवंडे आणि मुळा धरणातून कमी दाबाने पाणी सोडल्याने ४० ते ४५ टक्के पाण्याचा वाटेतच अपव्यय झाला असल्याचे, माहे नोव्हेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी करुन पाण्याचे योग्य नियोजन न करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) तसेच, उपरोक्त वहनव्यव रोखण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## चाकण (ता.खेड, जि.पुणे) वन परिक्षेत्राच्या व लगतच्या हद्दीत हॉटेल व कंपन्यामधील कचरा, घाण व रसायनयुक्त पाणी सोडले जात असल्याबाबत

**(२९) * ५०५५६ श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चाकण (ता.खेड, जि.पुणे) वन परिक्षेत्राच्या व लगतच्या हद्दीत हॉटेल व कंपन्यामधील कचरा, घाण, रसायनयुक्त पाणी सोडले जात असल्याने वन्य प्राणी व जनावरांच्या जीवितास धोका निर्माण झाल्याचे, माहे फेब्रुवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त वन संरक्षण करणेबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) हे खरे नाही.

(२) वन सरंक्षणाच्या दृष्टीने खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येत आहेत.

- क्षेत्रीय कर्मचारी व अधिकारी नियमित गस्त करतात.
- संयुक्त वनव्यवस्थापन समित्यांमार्फत वनक्षेत्रात घाण, कचरा न टाकण्याबाबत जनजागृती करण्यात येते.
- वनक्षेत्रात कचरा घाण न टाकण्याबाबतचे सूचना फलक लावण्यात येत आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मुंबईसह ठाण्यात हिमोफिलियाग्रस्त रुग्णांसाठी आवश्यक असणाऱ्या इंजेक्शनचा तुटवडा असल्याबाबत**

**(३०) * ५०७४७ श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.राज पुरोहित (कुलाबा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषत: मुंबईसह ठाण्यात हिमोफिलियाग्रस्तांचा रक्तस्त्राव थांबण्यासाठी आवश्यक असणाऱ्या फॅक्टर ८ इंजेक्शनचा गेल्या १५ दिवसांपासून तुटवडा असल्याची गंभीर बाब दिनांक १० फेब्रुवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केईएम रुग्णालयात आणि ठाण्याच्या शासकीय रुग्णालयात मोफत उपलब्ध असणाऱ्या या इंजेक्शनसाठी आता रुग्णांना हजारो रुपये मोजावे लागत आहेत, तर काहींना हे इंजेक्शन परवडत नसल्याने रुग्णांची प्रचंड गैरसोय होऊन त्यांना त्रास सहन करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तातडीने फॅक्टर ८ हे इंजेक्शन हिमोफिलियाग्रस्त रुग्णांसाठी उपलब्ध करुन देण्याबाबत शासन काय कार्यवाही करीत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) हिमोफिलिया आजाराच्या उपचारासाठी वापरण्यात येणारी औषधे महाराष्ट्र राज्यात जिल्हा रुग्णालय ठाणे, नाशिक, सातारा व अमरावती तसेच केईएम रुग्णालय, मुंबई व बी.जे. वैद्यकीय महाविद्यालय, पुणे या ठिकाणी मोफत उपलब्ध करुन देण्यात आली आहेत. एखाद्या ठिकाणी या औषधांची कमतरता भासल्यास इतर रुग्णालयाच्या साठयातुन पुरवठा करण्यात येतो. सद्यस्थितीत उपरोक्त सर्व ठिकाणी फॅक्टर ८ हे इंजेक्शन उपलब्ध आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अंतुलेनगर (जि.हिंगोली) येथे जिल्हा परिषदेच्या शाळेजवळ सांडपाणी साचत असल्याने विद्यार्थ्यांचे आरोग्य धोक्यात आल्याबाबत

**(३१) * ४१३२४ डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली शहरालगत असलेल्या अंतुलेनगर येथे जिल्हा परिषदेची प्राथमिक शाळेजवळ सांडपाणी चारही बाजुने साचत असल्याने शाळेभोवती घाणीचे साम्राज्य पसरल्याने विद्यार्थ्यांचे आरोग्य धोक्यात आले असूनही याकडे संबंधित प्रशासनाचे दुर्लक्ष होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त शाळेजवळील सांडपाण्याची विल्हेवाट न लावल्यास शाळा बंद करुन शाळा बायपास रस्त्यावर भरविण्याचा इशारा ग्रामस्थांनी माहे डिसेंबर, २०१५ च्या दुसऱ्या आठवडयात निवेदनाव्दारे स्थानिक बी.डी.ओ. यांना दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) नाही

(२) होय हे खरे आहे.

(३) सदर निवेदनाच्या अनुषंगाने ग्रामपंचायतीमार्फत शाळेसमोर सिमेंटचे पाईप टाकून सोलिंग व मुरुम टाकण्यात येऊन जे.सी.बी ने नाली खोदून शाळेच्या पाठीमागे दूरवर घाण पाणी काढण्यात आले आहे. सद्यस्थितीत शाळेसमोर कुठल्याही प्रकारचे घाण पाणी साचत नाही व मुलांच्या आरोग्यास कुठलाही धोका नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही

-----------------

**अमरावती येथे विदर्भ सधन सिंचन विकास कार्यक्रमांतर्गत जिल्हा परिषदेने डोहाच्या कामांसाठी काढलेल्या निविदा प्रक्रियेत झालेली अनियमितता**

**(३२) * ४३०१७ प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती येथे विदर्भ सधन सिंचन विकास कार्यक्रमांतर्गत जिल्हा परिषद सिंचन विभागाने डोहाच्या कामांसाठी निविदा काढल्या आहेत, या प्रक्रियेत कामांच्या रक्कमेच्या प्रमाणात कंत्राटदारांकडून सुरक्षा ठेव न घेताच कार्यारंभ आदेश दिला असल्याचे माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने सदर प्रक्रियेचा फेरविचार करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) नाही.

जलसंपदा विभागाच्या दिनांक २२ मे, १९९८ च्या परिपत्रकामध्ये दिलेल्या सुत्रानुसार अतिरिक्त सुरक्षा ठेव भरुन घेण्यात आली आहे.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## भडगांव (जि.जळगांव) तालुक्यात रोजगार हमी योजनेच्या कामात झालेला गैरव्यवहार

**(३३) * ४६०६५ डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भडगांव तालुक्यात (जि.जळगांव) सन २०१४-१५ वर्षामध्ये महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या कामात कनिष्ठ अभियंता श्री.अहिरे यांनी बनावट कामे दाखवुन संगनमताने लाखो रुपयांचा अपहार केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी अनेकवेळा तक्रारी केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले आहे,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) या प्रकरणी स्थानिक लोकप्रतिनिधीं यांचेकडून तक्रार प्राप्त झाल्याचे आढळून आलेले नाही.

तथापि स्थानिक स्तरावरुन एकूण ४ लेखी तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत.

स्थानिक स्तरावरुन प्राप्त झालेल्या एका तक्रारीचा चौकशी अहवाल प्राप्त झालेला असून सदरच्या तक्रारीमध्ये कोणतेही तथ्य नसल्याचे आढळून आले आहे. इतर ३ तक्रारींच्या अनुषंगाने चौकशी सुरु आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सोंड्याला (ता.तुमसर, जि.भंडारा) येथील बावनथडी नदीवर असलेल्या उपसासिंचन योजनेचे विद्युत बिल भरण्याबाबत

**(३४) * ४७५६८ श्री.चरण वाघमारे (तुमसर), श्री.रामचंद्र अवसरे (भंडारा), श्री.संजय पुराम (आमगाव) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोंड्याला (ता.तुमसर, जि.भंडारा) येथील बावनथडी नदीवर असलेल्या उपसा सिंचन योजनेचे विद्युत बिल भरण्याबाबत दिनांक २२ मार्च, २०१५ रोजी शासनास विनंती केली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने बिल भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय.
(२) प्रचलित धोरणानुसार उपसा सिंचन योजनेच्या विद्युत देयकांचा खर्च हा लाभधारकांकडून वसूल करणे अपेक्षित आहे. त्यानुसार कारवाई करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अकोला जिल्हयात लघुसिंचन विभागामार्फत राबविण्यात येत असलेल्या प्रकल्पांची कामे प्रलंबित असल्याबाबत

**(३५) * ४४७६८ श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम), डॉ.संजय कुटे (जळगाव जामोद), श्री.हरिष पिंपळे (मुर्तिजापूर) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भूसंपादनावरील खर्च वाढत गेल्याने लघुसिंचन विभागामार्फत राबविण्यात येत असलेल्या प्रकल्पांची कामे अकोला जिल्हयात प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच पिण्याच्या पाण्याची सुविधा कायमस्वरुपी उपलब्ध व्हावी यासाठी राबविण्यात आलेल्या पाणीपुरवठ्याच्या योजनेवर कोट्यवधी रुपये खर्च झाले असतानाही अद्याप पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडविण्यात जिल्हा परिषद, अकोला प्रशासनाला अपयश आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू प्रलंबित प्रकल्पांची कामे पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय.
(२) हे खरे नाही.
(३) साठवण तलाव ताजनापूर ता.आकोट, जि.अकोला या कामावर अद्यापपर्यंत भुसंपादनावर खर्च झालेला आहे. भुसंपादनाच्या नविन शासन निर्णयानुसार सदर अंदाजपत्रकात वाढ होत असल्याने प्रकल्पाचे सुधारित अंदाजपत्रक तयार करणेची कार्यवाही, कार्यकारी अभियंता, लघु सिंचन विभाग, जिल्हा परिषद, अकोला यांच्याकडून सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**नेवासा (जि.अहमदनगर) तालुक्यातील अंगणवाडी इमारतीचे नवीन बांधकाम निकृष्ट दर्जाचे असल्याबाबत**

**(३६) * ४९७३४ श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **महिला व बाल विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नेवासा (जि.अहमदनगर) तालुक्यात सुरु असलेल्या अंगणवाडी इमारत बांधकामाला बांधकाम सुरु असतानाच तडे गेले असून या कामाची चौकशी करण्याची मागणी येथील ग्रामस्थांनी केली असल्याचे माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरील निकृष्ट बांधकामाची शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीनुसार दोषी आढळून येणाऱ्यांवर शासनाने काय कारवाई केली वा करण्यात येणार आहे,
(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**कपासे (ता.जि.पालघर) येथील ग्रामपंचायतीच्या कारभारामध्ये झालेला गैरव्यवहार**

**(३७) * ४८०३६ श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कपासे ग्रामपंचायत (ता.जि.पालघर) येथील श्री.गजानन पागी, सरपंच यांचेविरुध्द ७ पैकी ५ सदस्यांनी ग्रामपंचायतीच्या कारभारामध्ये गैरव्यवहार केल्याबाबतचा अविश्वास प्रस्ताव तहसिलदार-पालघर यांच्या चुकीच्या नोंदीमुळे अप्पर जिल्हाधिकारी, पालघर यांनी नामंजूर केल्याने याबाबतची चौकशी करण्याची मागणी भिवंडी पूर्व येथील लोकप्रतिनिधींनी मा. ग्रामविकास राज्यमंत्री व मा.महसूल राज्यमंत्री यांच्याकडे माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच ग्रामपंचायत कपासे येथील सदस्यांनी त्यांचे राजीनामे ग्रामसेवकांकडे दिनांक ४ नोव्हेंबर, २०१५ रोजी देऊनही सरपंच, कपासे यांनी स्वाक्षरी करण्यास नकार दिल्याने ग्रामसेवकांनी फेरटिप्पणी गटविकास अधिकारी, पंचायत समिती, पालघर यांच्याकडे सादर करुनही कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त दोन्ही प्रकरणांची चौकशी केली आहे काय व चौकशीत काय आढळून आले व तदनुसार चुकीची नोंद घेणाऱ्या तहसिलदार, पालघर व गैरकारभार करणाऱ्या सरपंच, पालघर यांच्याविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

ग्रामसेवक ग्रामपंचायत कपासे यांनी पंचायत समिती, पालघर यांना कळविल्यानंतर पंचायत समिती, पालघर यांनी सरपंच ग्रामपंचायत कपासे यांना स्वयंस्पष्ट खुलासा सादर करण्याबाबत कळविले आहे. अन्यथा, सरपंच यांच्याविरुध्द महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम ३९ (१) अन्वये कारवाईचा प्रस्ताव सादर करण्याबाबत पत्र दिले आहे.

(३) होय.

अपर जिल्हाधिकारी, पालघर यांचा सदरचा निर्णय अर्धन्यायिक स्वरुपाचा असून तहसिलदार पालघर यांनी वापरलेल्या कार्यपध्दतीवर अवलंबून आहे. तहसिलदार पालघर यांनी १९५८ चा कायदा भंग केलेला नाही किंवा एखाद्या पक्षकाराच्या बाजूने आपला निर्णय जाणीव पुर्वक दिलेला नाही त्यामुळे तहसिलदार पालघर यांच्याविरुध्द कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्भवत नाही. सरपंच ग्रामपंचायत कपासे यांनी आपल्या कर्तव्यात कसूर केली असल्यामुळे त्यांचेवर ३९ (१) अन्वये पंचायत समिती पालघर यांचेमार्फत नोटीस बजावण्यात आली आहे.

(४) अशी बाब नाही.

-----------------

**सारोळा (ता.जळगांव) येथील ग्रामरोजगार सेवक व गट विकास अधिकारी यांनी केलेला गैरव्यवहार**

**(३८) * ३९७७२ श्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सारोळा (ता.जळगांव) येथील ग्रामरोजगार सेवक यांनी गट विकास अधिकारी यांनी मनरेगा योजनेतील कामांचे ७ हजेरीपट निरंक करणे, त्याचप्रमाणे बनावट कागदपत्रे तयार करुन अन्य निधीचा परस्पर अपहार करणे आदि संदर्भात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोणताही कार्यारंभ आदेश नसताना उक्त योजनेतील कामे पूर्ण झाल्याचे दाखवून शासनाचा लाखो रुपयांच्या निधीचा अपहार केल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ग्रामरोजगार सेवकाच्या हजेरीपटावर सहया नसताना हजेरीपट न भरता सदावर्ते यांनी लाखो रुपयांचे हजेरीपट परस्पर मंजूर करुन शासनाच्या निधीचा अपहार केल्याप्रकरणी शासनाने सखोल चौकशी केली आहे काय व चौकशीअंती काय आढळून आले,

(४) तद्नुसार दोषी व्यक्तींवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) प्रश्नात ७ हजेरीपट निरंक केले असल्याचे नमूद आहे. तथापि, कामावर मंजूर उपस्थित नसल्याची तक्रार ग्रामरोजगार सेवकाने केली असल्याने प्रत्यक्षात ६ हजेरीपट रद्द करण्यात आले हे खरे आहे. परंतु कागदपत्रे बनावट नसून अपहार झालेला नाही. तथापि, याबाबत ग्राम रोजगार सेवकाने न्यायालयात वैयक्तिक तक्रार दाखल केल्याने पोलीस निरिक्षक यांचेमार्फत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) याबाबत ग्राम रोजगार सेवकाने न्यायालयात वेयक्तिक तक्रार दाखल केल्याने पोलीस निरिक्षक यांचेमार्फत चौकशी सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**पाटथर (ता.देवगड, जि.सिंधुदुर्ग) येथील मगमाचे वहाळ येथे एकात्मिक पाणलोट योजनेतून बांधलेल्या बंधाऱ्याचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत**

**(३९) * ४४५८६ श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाटथर (ता.देवगड, जि.सिंधुदुर्ग) येथील मगमाचे वहाळ येथे एकात्मिक पाणलोट योजनेतून तालुका कृषी विभागामार्फत लाखो रुपये खर्च करुन बांधलेल्या सिमेंट पक्का बंधाऱ्याचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे झाल्याचे नुकतेच माहे जानेवारी २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) सदर बंधाऱ्याचे काम निकृष्ट झाल्याने बंधाऱ्यात पाणी साचत नाही, तसेच बंधारा बांधताना पारंपारिक पाण्याचा उद्ध्वस्त केल्याने पाटथर गावाला होणारा नैसर्गिक पाणी पुरवठा बंद झाला आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त निकृष्ट बंधाऱ्याच्या कामाची सखोल चौकशी व्हावी व पुन्हा नव्याने बंधारा बांधण्यात यावा, अशी मागणी पाटथर ग्रामस्थांनी शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(५) तद्नुसार यास जबाबदार असणाऱ्या व्यक्तींवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे, नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय, हे खरे आहे.

याबाबत मौजे पाटथर ग्रामपंचायतीने दि. २६.०१.२०१४ रोजीच्या ग्रामसभेत सदर कामाच्या निकृष्ट गुणवत्तेबाबत ठराव केलेला आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

पूर्वी सदर जागेवर कच्चा वळण बंधारा अस्तित्वात होता. त्यामधून पिण्याच्या पाण्याचा नैसर्गिक पाणीपुरवठा होत होता. तो या बंधा-यामुळे बंद झाला.

(३) होय, हे खरे आहे.

याबाबत मौजे पाटथर ग्रामपंचायतीने दि. २६.०१.२०१४ रोजीच्या ग्रामसभेत सदर कामाच्या गुणवत्तेबाबत ठराव केलेला आहे. सदरचा ठराव ग्रामपंचायतीने त्याचे पत्र दि.२९ मार्च २०१५ अन्वये तालुका कृषी अधिकारी, देवगड यांना कार्यवाहीसाठी दिला आहे.

(४) होय, तालुका कृषी अधिकारी देवगड यांनी सदर कामाचे समक्ष पहाणी केली असून सदर बंधारा सुस्थितीत असल्याचे व नैसर्गिक पाणीपुरवठा स्त्रोत पुनर्जीवत करण्यासाठी या बंधा-याच्या खालील बाजूस कच्चा वळण बंधारा बांधण्याचे मार्गदर्शन त्यांनी स्थानिक ग्रामस्थांना केले आहे.

(५) ग्रामपंचायत पाटथर यांनी कृषी विभागाकडे मागणी केल्याप्रमाणे पारंपारिक पाण्याचा नैसर्गिक स्त्रोत श्रमदानातून पुनर्जीवत केला असल्यामुळे या कामाबाबत सध्या सदर ग्रामपंचायतीची कोणतीही तक्रार नाही असे त्यांनी दि.९ मार्च २०१६ च्या पत्रान्वये कळविले आहे.

-----------------

## सिंदखेडराजा (जि.बुलढाणा) तालुक्यातील पांगरी उगले येथील सिंचन तलावाच्या कामात झालेला गैरव्यवहार

**(४०) * ४९१८४ डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) किनगाव राजा (जि.बुलढाणा) भुसिंचन उपविभाग देऊळगांव राजाअंतर्गत पांगरी उगले (ता.सिंदखेडराजा) येथील सिंचन तलावात गैरव्यवहार झाल्याचे तक्रार ग्रामस्थांनी नुकतीच माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) उपरोक्त तलावाच्या विशेष दुरुस्तीचे टेंडर सिंचन विभाग, जि.प. बुलढाणा यांनी माहे फेब्रुवारी, २०१४ मध्ये मनिषा कन्स्ट्रक्शनला दिले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त काम नऊ महिन्यात पूर्ण करावे, तसेच कामाची गुणवत्ता तपासण्यासाठी त्रिसदस्यीय समिती नेमून काम सुरु असताना व पूर्ण झाल्यानंतर फोटो काढयात यावे असे आदेश असतांनाही ठेकेदारांनी सर्व नियम डावलून काम केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर काम अंदाजपत्रक “अ” प्रमाणे १८ लाख ९३ हजार ४०० रुपये व वर्कऑर्डरप्रमाणे कामाची निविदा किंमत परिशिष्ट “ब” नुसार १७ लाख ७२ हजार ४५२ रुपये एवढी ठेवण्यात आली असताना सदर कामाची प्रत्यक्ष पाहणी केली असता सदर काम फक्त ८० हजारांपर्यत करुन गैरव्यवहार केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(६) तद्नुसार दोषी व्यक्तींवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय.

माहे नोव्हेंबर, २०१५ मध्ये अशी तक्रार जिल्हा परिषद, बुलढाणा यांचेकडे प्राप्त झाली आहे.

(२) हे खरे आहे.

(३) सदर कामास दिनांक ७ मार्च, २०१४ रोजी सुरूवात करून दिनांक २५ नोव्हेंबर, २०१४ रोजी पूर्ण करण्यात आले. सदरचे दुरुस्तीचे काम सुरु करणे पुर्वीचे, काम सुरु असतांना व काम पूर्ण झाल्यानंतरचे सर्व फोटो काढण्यात आले आहेत.

(४) सदर दुरुस्तीचे काम अंदाजपत्रकाप्रमाणे पूर्ण करण्यात आले असून कामावर प्रत्यक्षात रुपये १७.१७ लक्ष एवढा निधी खर्च झाला आहे. काम सुरू असताना कार्यकारी अभियंता, सिंचन विभाग, जिल्हा परिषद, बुलढाणा व उप विभागीय अधिकारी, सिंचन उप विभाग, देउळगांव राजा यांनी कामास वेळोवेळी भेटी दिल्या असून गुणवत्तेबाबत खात्री करण्यात आली असून कामामध्ये गैरव्यवहार झाल्याचे दिसून आले नाही.

(५) संबंधीत तक्रारदारास चौकशीसाठी मोक्यावर हजर रहाणेबाबत लेखी कळविण्यात आले होते. ठरल्यानुसार तक्रारदार व उप विभागीय अधिकारी, सिंचन उप विभाग देऊळगांव राजा यांनी कामाची संयुक्त पाहणी करुन तक्रारदारास अंदाजपत्रकाची प्रत देवून केलेल्या दुरुस्तीची माहिती देण्यात आली. त्यानुसार तक्रारदाराने कामाची पाहणी झाल्यानंतर त्यांचे समाधान झाले असल्याबद्दल कार्यकारी अभियंता, सिंचन विभाग, जिल्हा परिषद, बुलढाणा यांना लेखी स्वरुपात कळविले आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सोलापूर जिल्हयातील ऊसाचे उत्पादन पाण्याविना घटल्यामुळे शेतकऱ्यांचे झालेले आर्थिक नुकसान

**(४१) * ४२२१७ श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्हयातील सीना-माढा उपसा सिंचन योजना, कालवा, भीमा सीना जोड कालवा, भीमा काठ, सीना काठ यावरील ऊस पिके पाण्यावाचून करपून गेली असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ऊस जळून जात असल्यामुळे ऊसाचे वजन घटल्याने उत्पन्नात प्रचंड घट झाल्याने ऊस असूनही शेतकरी तोट्यात जात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी पाण्याचा व शेतकऱ्यांना आर्थिक नुकसान होऊ नये यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन : (**१) अंशत: खरे आहे.

सन २०१५ मधील सोलापूर जिल्हयातील पर्जन्यमान सरासरीच्या एकुण ५३% झाले आहे. तसेच उजनी जलाशयात पाणीसाठा न झाल्याने पाण्याअभावी ऊस वाढीवर व उत्पादकतेवर प्रतिकूल परिणाम झाल्याचे दिसून आले आहे.

(२) अंशत: खरे आहे.

ऊस पिक कापणी प्रयोग खरीप हंगाम सन २०१५-१६ मधील निष्कर्षानूसार सरासरी २० टक्के उत्पादनात घट झाली आहे.

(३) ऑक्टोबर २०१५ अखेर पर्यंत उजनी धरणात पुरेसा पाणीसाठा झाला नसल्याने सिंचनासाठी पाणी सोडण्यात आलेले नाही. सदर बाब ही नैसर्गीक आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**नांदेड जिल्हयातील प्रकल्पांमधून अवैधरीत्या पाण्याचा उपसा होत असल्याबाबत**

**(४२) * ४२९७३ श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्हयातील दोन मोठे, नऊ मध्यम आणि ८० लघु प्रकल्प अशा एकूण ९१ प्रकल्पात सध्या फक्त ८१.६४ दशलक्ष घनमीटर (१५.२३) टक्के पाणी साठा उपलब्ध असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मागील वर्षाच्या तुलनेत यंदाच्या वर्षी पाणीसाठा अंदाजे निम्म्याने कमी झाला असून हा पाणीसाठी पिण्याच्या पाण्यासाठी आणि जनावरांना पिण्यासाठी आरक्षण करण्यात आले आहे मात्र असे असले तरी काही ठिकाणी अजूनही या पाण्याचा अवैधरीत्या उपसा होत आहे,हे ही खरे आहे काय,

(३) या अवैध पाणी उपशावर कारवाई करण्याचे व गुन्हेही दाखल करण्याचे आदेश शासनाने दिले असूनही अद्यापही गुन्हे नोंद करण्यात आलेले नाहीत, हे ही खरे आहे,

(४) असल्यास,उक्त प्रकरणी शासनाने काय चौकशी केली व चौकशीअंती काय आढळून आले,

(५) असल्यास, त्यानुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय.

नांदेड जिल्हयातील ९१ प्रकल्पांचा ३१ जानेवारी, २०१६ अखेरचा उपयुक्त पाणीसाठा ६०.५१ दलघमी (११.२८%) एवढा होता.

(२) टंचाईग्रस्त परिस्थिती असल्याने जिल्हाधिकारी नांदेड यांनी आवश्यकतेनूसार पाणीसाठा आरक्षित केला आहे. तथापि जलाशयातील उपसा थांबविण्याकरिता जिल्हाधिकारी नांदेड मार्फत पाण्याचा अवैधरित्या उपसा रोखण्याकरिता दक्षता पथक नेमण्यात आले आहे. सदर उपसा करणाऱ्यावर कायदेशीर कार्यवाही करणेसाठी कर्मचाऱ्यांना प्राधिकृत करण्यात आले आहे.

(३) हे खरे नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**कऱ्हाड तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रातील अनेक पदे रिक्त असल्याबाबत**

**(४३) * ४२५२३ श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कऱ्हाड तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रातील अनेक पदे रिक्त असल्यामुळे आरोग्य सेवेवर परिणाम होत असणे, उपलब्ध डॉक्टर आणि कर्मचाऱ्यांवर अतिरिक्त ताण येणे पंचायत समिती मार्फत जिल्हा परिषदेस रिक्त पदांसाठी सातत्याने पाठपुरावा करुनही रिक्त पदे भरली गेली नसल्याचे माहे जानेवारी, २०१६ च्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रिक्त पदे भरण्याबाबत शासन स्तरावरुन कोणती कार्यवाही केली आहे अथवा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे नाही,

कराड तालुक्यामध्ये एकुण ११ प्राथमिक आरोग्य केंद्रे सुरु आहेत. सदर प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये वैद्यकीय अधिकारी गट-अ संवर्गाची २२ पदे मंजूर असून त्यापैकी २१ पदे भरलेली व १ पद रिक्त आहे. गट-क संवर्गाची एकूण १८५ पदे मंजूर असून त्यापैकी १७७ पदे भरलेली व ८ पदे रिक्त आहेत. गट-ड संवर्गाची एकूण ५६ पदे मंजूर असून ३३ पदे भरलेली व २३ पदे रिक्त आहेत. उपलब्ध वैद्यकीय अधिकारी व कर्मचा-यांमार्फत रुग्णांना आवश्यक रुग्णसेवा पुरविण्यात येत असून रुग्णसेवेवर परिणाम झालेला नाही.

(२) वैद्यकीय अधिकारी गट-अ संवर्गाची रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे. गट-क व गट-ड संवर्गाची रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**हिवरे (ता.सिन्नर, जि.नाशिक) येथील लघु पाटबंधारे योजनेस प्रशासकीय मान्यता मिळण्याबाबत**

**(४४) * ४५४७२ श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिन्नर (नाशिक) तालुका कायमस्वरुपी दुष्काळी तालुका असल्याने येथील हिवरे येथील लघु पाटबंधारे योजनेस पाणी उपलब्धता प्रमाणपत्र, पाणी परवानगी प्राप्त असल्याने प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ५ जानेवारी, २०१६ रोजी वा त्या सुमारास मा.जलसंपदा व जलसंधारण राज्यमंत्री यांचेकडे लेखी पत्राद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय.

(२) योजनेचे सविस्तर सर्वेक्षण व अन्वेषण पूर्ण करण्यात आलेले असून पाणी उपलब्धता प्रमाणपत्रही प्राप्त झालेले आहे. प्रशासकीय मान्यतेसाठीचे अंदाजपत्रके व नकाशे तयार करण्याची कार्यवाही प्रगतीत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजे गोळेगाव (प.क.) (ता.लोहा, जि.नांदेड) येथे सामाजिक वनीकरणाच्या कामात झालेला गैरव्यवहार

**(४५) * ४७००९ श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे गोळेगाव (प.क.) (ता.लोहा, जि.नांदेड) येथे सामाजिक वनीकरणाच्या कामात मोठया प्रमाणावर गैरव्यवहार झाला असून सदर कामाचे हजेरीपटावर लहान बालके व अपंग व्यक्तींची बोगस नावे असल्याचे व लागवड अधिकाऱ्याने तर दोन लहान बालकांची नावे हजेरीपटावर टाकून त्यांच्या नावे पैसे घेतल्याची बाब माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी करण्यात आली आहे काय

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रस्तुत प्रकरणी भाग-१ मध्ये नमुद केलेली बाब निदर्शनास आली नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## खांदेश्वर वसाहतीमधील (ता.पनवेल) बालग्राम आश्रमातील एका बालिकेवर झालेला बलात्कार

**(४६) * ४३५०२ श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.विजय औटी (पारनेर), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.प्रशांत बंब (गंगापूर), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **महिला व बाल विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पनवेल येथील खांदेश्वर वसाहतीमधील बालग्राम आश्रमातील एका बालिकेवर याच आश्रमाचे नियंत्रकाचे काम करणाऱ्या सहायक अधिक्षकाने माहे जानेवारी २०१६ मध्ये वारंवार बलात्कार केल्याची घटना घडली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधित सहायक अधिक्षकावर बलात्कार आणि बालक लैंगिक शोषण प्रतिबंधक कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणासंदर्भात चौकशी करण्यात आली आहे काय असल्यास त्यानुषंगाने दोषी व्यक्तीविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही,

जि.रायगड येथील बालग्राम या संस्थेतील एका प्रवेशित मुलीने संस्थेचे अधिक्षक यांनी दि.१५.०१.२०१६ रोजी अतिप्रसंग केल्याची तक्रार दि.१६.०१.२०१६ रोजी पोलिस स्टेशनमध्ये नोंदविलेली होती. त्यावर दि.२९/१/२०१६ रोजी प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, पनवेल(महिला) यांचे समोर बाल कल्याण समिती सदस्य,बाल न्याय मंडळ सदस्य तसेच जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी रायगड व मुलीची आई यांचे उपस्थितीत सदर मुलीचा पुरवणी जबाब नोंदविला असता सदर जबाबामध्ये दिलेली तक्रार ही खोटी असून ती रागाच्या भरात दिली असल्याचे संबंधित मुलीने कबूल केले आहे.

(२) होय.

(३) सदर प्रकरणी संस्थेचे अधिक्षक श्री उत्तम घुगे व गृहमाता श्रीमती नादीरा शेख यांचेविरूध्द खांदेश्वर पोलीस ठाणे पनवेल येथे भा.द.वि कलम ३४२, ३७६(C) ३५४, ५०६, ३४ R/W व POCSO Act २०१२ (पॉक्सो ) अंतर्गत कलम ५ (DNOP),६(DNOP) /१० नुसार गुन्हा नोंदविलेला असून FIR No.१३/२०१६ दि. १९/१/२०१६ असा आहे. तसेच सद्यस्थितीत या दोघांना बालग्राम महाराष्ट्र या संस्थेने सेवेतून निलंबित केले असून त्यांना प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,पनवेल यांनी जामीन मंजूर केला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नांदरुख ग्रामपंचायतीने पर्यावरण संतुलित ग्राम समृध्द योजनेतंर्गत वस्तूंच्या व रोपांच्या खरेदीत कलेला गैरव्यवहार

**(४७) * ५०२२७ श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदरुख ग्रामपंचायतीने सन २०१३ ते २०१६ या कालावधीत पर्यावरण संतुलित ग्राम समृध्द योजनेतंर्गत वस्तूंच्या व रोपांच्या खरेदीत विद्यमान सरपंच व तत्कालीन ग्रामसेवक यांनी गैरव्यवहार केला असल्याची बाब माहे फेब्रुवारी, २०१६ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय व चौकशीत काय आढळून आले आहे,

(३) असल्यास, सदर प्रकरणातील दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) नाही.

(२) प्रश्नच उद्भवत नाही.

(३) प्रश्नच उद्भवत नाही.

(४) प्रश्नच उद्भवत नाही.

-----------------

## पश्चिम महाराष्ट्रातील सिंचन योजनांच्या कामांना चालना देण्यासाठी स्वतंत्र धोरण राबविण्याबाबत

**(४८) * ४४०६१ श्री.राजन साळवी (राजापूर), श्री.उल्हास पाटील (शिरोळ), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी), श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव), श्री.संजय (बाळा) भेगडे (मावळ), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सुरु असलेल्या ६०१ सिंचन प्रकल्पांपैकी २२५ प्रकल्पांची कामे जवळपास १५ वर्षापासून संथ गतीने सुरु आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, संथगतीने काम सुरु असल्याने त्यावर नियोजनापेक्षा सुमारे ६० हजार कोटी रुपयांचा अतिरिक्त खर्च झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पश्चिम महाराष्ट्रातील सिंचन योजनांची कामे अद्यापही बंद असून या सिंचन योजनांच्या कामांना चालना देण्यासाठी स्वतंत्र धोरण राबविण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर सिंचना प्रकल्प तातडीने पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) नाही. सद्य:स्थितीत राज्यात ४०३ प्रकल्प बांधकामाधीन असून भूसंपादन, पुनर्वसन, वनजमिन व प्रकल्पग्रस्तांचा विरोध इत्यादी अडचणी दूर करुन उपलब्ध निधीतून प्रकल्पांची कामे करण्यात येत आहेत.
(२) विविध अडचणींमुळे प्रकल्प पूर्णत्वास झालेल्या विलंबामुळे प्रकल्पावरील खर्चात वाढ झाली आहे.
(३) पश्चिम महाराष्ट्रातील प्रकल्पांची जी कामे बंद आहेत ती प्रामुख्याने प्रकल्पग्रस्तांच्या विरोधामुळे बंद आहेत. उर्वरित प्रकल्पांची कामे उपलब्ध निधीतून सुरु आहेत.

राज्यातील प्रकल्पांसाठी वित्तीय संस्थांकडून दिर्घ मुदतीचे अर्थसहाय्य घेणे विचाराधीन आहे.
(४) पाटबंधारे प्रकल्पांचे दायित्व मोठे असल्याने प्रकल्प पूर्णत्वाच्या कोणत्या टप्प्यावर आहे याबाबतचा आढावा घेऊन प्राथम्य क्रमानुसार आर्थिक गुंतवणूक करण्याचे धोरण स्विकारले आहे. त्यानुसार अमरावती प्रदेशातील अनुशेष निर्मूलन कार्यक्रमातील सर्व प्रकल्प व पुढील ३ वर्षात सिंचनाचा लाभ शेतक-यांना मिळू शकेल अशा अन्य जिल्हयातील प्रकल्पांना प्राधान्य देण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे जिल्ह्यातील लवासा येथील पाणी वरसगाव धरणात सोडण्याबाबत

**(४९) * ५०४८४ श्री.योगेश टिळेकर (हडपसर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यातील खडकवासला, पानशेत, वरसगाव व टेमघर या धरणांचा पाणीसाठी अत्यल्प झाला असून सर्व धरणात एकूण १० टीएमसी पाणी साठा माहे जानेवारी, २०१६ पर्यंत शिल्लक आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुणे जिल्ह्यातील पाणीपुरवठा योजनांसाठी खडकवासला धरणातील एक टीएमसी पाणी न घेता लवासाबरोबर झालेल्या करारानुसार, त्यांच्या धरणामधील पाणी वरसगाव धरणात सोडण्यात यावे अशी मागणी सामाजिक संघटनांनी दिनांक १३ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास जिल्हाधिकारी, पुणे यांना केली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त करारानुसार तेथील पाणी वरसगाव धरणात सोडण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय.

जानेवारी, २०१६ अखेर १०.९३ टी.एम.सी. इतका पाणीसाठा होता.

(२) नाही.

(३) लवासा येथील गडले बंधाऱ्यातील पुर्ण पाणीसाठा वरसगांव धरणामध्ये सोडण्यात आले आहे. दासवे बंधाऱ्यातील पाणी आवश्यकतेनुसार सोडणे नियोजित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मांडवी (ता.किनवट, जि.नांदेड) येथील उपसरपंच व ग्रामसेवक यांनी सरपंचांच्या खोट्या स्वाक्षऱ्या करुन केलेला गैरव्यवहार

**(५०) * ५१४४२ श्री.प्रदीप नाईक (किनवट) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मांडवी (ता.किनवट, जि.नांदेड) येथील उपसरपंच व ग्रामसेवकांनी सरपंचाची खोटी स्वाक्षरी करुन देशी दारुच्या दुकानास संमती दिल्याची तक्रार सरपंच व

ग्रामपंचायत सदस्य व स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे डिसेंबर, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच खोट्या ठरावाद्वारे ग्रामपंचायतीच्या मालकीचे गाळे वाटप सुध्दा उपसरपंचांनी स्वत:च्या मुलाच्या नावे करुन घेतले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(४) असल्यास, शासनाने दोषी ग्रामसेवक व उपसरपंचावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय.

(२) नाही.

(३) या प्रकरणी केलेल्या चौकशीनुसार मांडवी ग्रामपंचायतीची मोकळी असलेली जागा मालमत्ता क्र.२३, ग्रामपंचायतीने दि.२२.१२.२०१३ रोजीच्या मासिक सभेमध्ये ठराव क्र.८ नुसार सात ग्रामस्थांना तीन वर्षासाठी प्रति महिना रू.४००/- याप्रमाणे भाडेतत्त्वावर मंजूर केली आहे. सदर सात ग्रामस्थांमध्ये उपसरपंचाच्या मुलाचा समावेश आहे. या सातपैकी प्रत्यक्षात ५ जणांनी करारनामा केला आहे. सदरील प्रस्ताव मंजूरीसाठी नांदेड जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे कार्योत्तर मंजूरीसाठी पाठविण्यात आला आहे. तसेच मद्यविक्री अनुज्ञप्ती परवान्यासाठी ग्रामपंचायतीने ठरावाद्वारे मंजूरी दिलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**सांगोला (जि. सोलापूर) तालुक्यात ग्रामीण प्रकल्पांतर्गत अंगणवाडयांना दिला जाणाऱ्या शालेय पोषण आहाराची विक्री होत असल्याबाबत**

**(५१) * ४०८७८ श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुरेश लाड (कर्जत) :** सन्माननीय **महिला व बाल विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्हयातील सांगोला तालुक्यात ग्रामीण प्रकल्पांतर्गत अंगणवाडयांना दिला जाणारा शालेय पोषण आहार गणेशवाडी (ता.मंगळवेढा) येथे विक्री करीत असताना तेथील ग्रामस्थांनी दिनांक १३ डिसेंबर २०१५ रोजी वा त्यासुमारास पकडला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी त्याच सुमारास तेथील ग्रामस्थांनी मंगळवेढा पोलिसांत फसवणूक व विश्वासघात केल्याचा गुन्हा दाखल केला आहे, हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व चौकशीअंती संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे अशंत: खरे आहे.
(२) व (३) बाल विकास प्रकल्प अधिकारी, सांगोला यांनी दि.११ डिसेंबर, २०१५ रोजी पोलिस स्टेशन मंगळवेढा येथे उपस्थित राहून चौकशी केली असता शारदादेवी महिला बचत गटामार्फत प्रकल्पातील अंगणवाडयांना घरपोच आहाराचा पुरवठा करण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे. सदर आहार उत्पादन केंद्रातून थेट अंगणवाडयांना पुरविण्यात आल्यानंतर उर्वरित आहार वाहनचालक यांनी उत्पादन केंद्रात जमा न करता मौजे गणेशवाडी ता.मंगळवेढा येथे परस्पर अनधिकृतपणे विक्रीस नेला असल्याचे दिसून आले. त्यामुळे व्यवस्थापक, शारदादेवी महिला बचत गट, कडलास, ता.सांगोला यांनी संबंधित वाहनचालक यांचेविरुध्द पोलीस स्टेशन मंगळवेढा येथे फिर्याद दाखल केली असून त्यांचेविरुध्द फौजदारी स्वरुपाची कारवाई झालेली आहे. यासंबंधी पोलीस तपास चालू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**घाटंजी (जि.यवतमाळ) वनपरिक्षेत्र येथील इंजाळा जंगलात सागवान वृक्ष आरीने तोडल्याबाबत**

**(५२) * ४६५५९ श्री.राजु तोडसाम (अर्णी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) घाटंजी (जि.यवतमाळ) वनपरिक्षेत्र येथील इंजाळा जंगलात मोठ्या प्रमाणावर

सागवान वृक्षांची आरीने तोड झाल्याचे दिनांक ४ नोव्हेंबर, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त ठिकाणापासून वनोपज तपासणी नाका केवळ १०० ते १५० मिटर अंतरावर आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय चौकशीनुसार दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) एफडीसीएम लिमिटेडच्या यवतमाळ वन प्रकल्प विभागातील कक्ष क्र.२२७ इंजाळा ता.घाटंजी येथे दिनांक २५ ऑक्टोबर २०१५ रोजी १२ सागवान वृक्षाची आरीने तोड झाल्याचे आढळले आहे.

(२) घटनास्थळाचे कक्ष क्र.२२७ या ठिकाणापासून पांढरकवडा वनविभागाचे इंजाळा वनोपज नाका १ किमी अंतरावर आहे.

(३) अवैध तोड करणारे पळुन गेलेले आरोपीचा शोध लागलेला नाही. अवैध वृक्ष तोड आढळल्यानंतर लगेच चौकशी करण्यात आली. आरोपींचा शोध घेण्याची कार्यवाही करण्यात आली. तथापि पळून गेलेले आरोपींचा शोध लागला नाही.

(४) विलंब नाही.

-----------------

**औषधांच्या अपुऱ्या पुरवठ्यामुळे राज्यात क्षय रुग्णांचे प्रमाण वाढत असल्याबाबत**

**(५३) * ३९९८१ श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) क्षय रुग्णासाठी राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रमानुसार आठवड्यातून काही दिवस घ्यावी लागणारी औषधे ही रुग्णांना दररोज देण्याचा निर्णय होऊनही औषधांच्या अपूऱ्या पुरवठ्यामुळे राज्यातील रुग्णांना ही औषधे दररोज मिळत नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गेल्या ९ महिन्यात क्षय रोगाची लागण राज्यातील १ लाखाहून अधिक लोकांना झाल्याची माहिती शासनाच्या माहे डिसेंबर, २०१५ च्या अहवालात नमूद करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, क्षय रुग्णावर उपचार करणाऱ्या मुंबईतील विविध शासकीय रुग्णालयातील ५१ सरकारी डॉक्टरांना क्षय रोगाची लागण झाल्याची माहिती मार्डच्या अध्यक्षांनी दिली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, क्षयरोगासाठी वापरल्या जाणाऱ्या सेकंडलाइन औषधांची कमतरता, सदर औषधे महाग असल्याने, खाजगी मेडिकल मधून विकत घेणे रुग्णांना शक्य नसल्याने तसेच प्रत्येक रुग्णांकडे वैयक्तिक स्तरावर लक्ष देण्याची क्षमता शासकीय यंत्रणेकडे नसल्याने रुग्णांच्या संख्येत वाढ होत आहे, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, या प्रकरणी शासनाने अधिक चौकशी केली आहे काय चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार या प्रकरणी कोणती प्रतिबंधात्मक उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे नाही.

(२) राज्यात माहे जानेवारी २०१५ ते माहे डिसेंबर, २०१५ अखेर १,३०,९१० क्षयरुग्ण आढळून आले असून सदरची माहिती शासनास सादर केलेल्या अहवालात नमूद करण्यात आली आहे, हे खरे आहे.

(३) मुंबईतील विविध शासकीय रुग्णालयातील क्षय रुग्णावर उपचार करणाऱ्या १९ सरकारी डॉक्टरांना क्षय रोगाची लागण झालेली असून सदर डॉक्टरांना क्षयरोगाचा उपचार सुरु आहे.

(४) हे खरे नाही.

(५) राज्यात सुधारीत राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रमाची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी ४३५ क्षयरोग उपचार पथके व १४५२ सूक्ष्मदर्शी केंद्रे स्थापन करण्यात आली आहेत. क्षय रुग्णांना मोफत डॉटस् उपचार देण्यासाठी ३६,९२५ डॉट प्रोव्हायडर्स कार्यरत आहेत. या कार्यक्रमांतर्गत केंद्रशासनाने करार तत्वावर २१९३ कर्मचारी मंजूर केलेले आहेत.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**सीपीआरमधील (जि.कोल्हापूर) ऑर्थोपेडिक विभागातील**
**मशिन विनावापर पडून असल्याबाबत**

**(५४) * ४२९८६ श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सीपीआरमधील (जि.कोल्हापूर) ऑर्थोपेडिक विभागातील साडेदहा लाख रुपयांची मशिन गेली तीन वर्षापासून धुळखात पडून असल्याचे नुकतेच माहे जानेवारी, २०१६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मशिनच्या दुरुस्तीसाठी विलंब लागण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, ऑर्थोपेडिक विभागातील विनावापर पडून असलेली मशीन वापरात घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात वा येत आहे ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.

सद्य:स्थितीत मशीन कार्यरत आहे.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**वाशिम जिल्हयातील ८८ लघुप्रकल्पांची देखभाल दुरुस्ती व कॅनाल्स**
**दुरुस्तीसाठी निधी मिळण्याबाबत**

**(५५) * ४९८२६ श्री.अमित झनक (रिसोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाशिम पाटबंधारे मंडळांतर्गत येणाऱ्या जिल्हयातील ८८ लघुप्रकल्पांची देखभाल, दुरुस्ती व कालव्याच्या दुरुस्तीकरिता अत्यल्प निधी मिळत असल्यामुळे सर्वच प्रकल्पावरील कालवे नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत, त्यामुळे त्याचा पाणी वितरण प्रणालीवर विपरीत परिणाम झाला असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, येथील सोनल व एकबुर्जी या मध्यम प्रकल्पासाठी शासनाकडून निधी मिळालेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकल्प व कालव्याच्या दुरुस्तीसाठी आवश्यक निधी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) हे अंशत: खरे आहे.

वाशिम पाटबंधारे मंडळाअंतर्गत ८८ प्रकल्प पुर्ण झालेले असून त्यामध्ये २ मध्यम, ६३ ल.पा.योजना आणि २३ ल.पा.(संग्राहक) योजना आहेत. कालवा प्रणाली असलेल्या २ मध्यम व ६३ ल.पा.प्रकल्पांचे कालवे नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत अशी वस्तुस्थिती नाही. प्रतिवर्षी प्रकल्पाची देखभाल दुरुस्तीची कामे नियमितपणे करणे आवश्यक असते. त्यानुसार निधी उपलब्धतेनुसार प्राधान्यक्रम ठरवून या प्रकल्पांची दुरूस्ती कामे करण्यात येतात. मात्र काही प्रकल्पांचे कालवे फार जुने असल्यामुळे प्रकल्पांच्या पाणी वितरणप्रणालीवर अशंत: परिणाम होतो. ही वस्तुस्थिती आहे.
(२) शासनाच्या प्रचलित मापदंडानुसार नियमित देखभाल दुरूस्तीसाठी निधी देण्यात येतो. त्यानुसार सोनल व एकबुर्जी प्रकल्पाला निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

### खोपी-पिंपळवाडी धरणातील पाणी शेतकऱ्यांना शेतीसाठी देण्याबाबत

**(५६) * ५१४५० श्री.संजय कदम (दापोली), श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खोपी- पिंपळवाडी धरणाच्या कामावर सुमारे ९० कोटी रुपये खर्च होऊनही शेतकऱ्यांना शेतीसाठी पाणी देण्याबाबत प्रशासन दुर्लक्ष करीत असल्याच्या निषेधार्थ सातगाव भागातील ग्रामस्थांनी दिनांक २६ जानेवारी, २०१६ रोजी वा त्या सुमारास उपोषण केले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शहरापासून २५ किमी अंतरावर असलेल्या डुबी नदीवर १९८३ मध्ये धरण बांधण्यात आले मात्र ३५ वर्षे झाली तरी काम सुरुच असून डाव्या व उजव्या कालव्यांतर्गत येणारी जमीन अद्यापही ओलिताखाली आली नसल्याने व

खोपी, कुंभाड, भिर्ले, शिरगाव, तिसंगी, कुळवंडी, विजहार या ७ गावांना अद्यापही पाणीवाटप झाले नसल्यामुळे ग्रामस्थ संतप्त झाले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास,या गावांतील लोकांना पिण्यासाठी व शेतीला पाणीपुरवठा तात्काळ होण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन : (**१) खोपी पिंपळवाडी प्रकल्पावर माहे २/१६ अखेर एकूण रु.७५.५२ कोटी इतका खर्च झालेला आहे. सातगाव ग्रामस्थ २६ जानेवारी १६ रोजी उपोषणास बसणार होते. तथापि त्यांच्या शंकांचे क्षेत्रीय स्तरावर निरसन झाल्याने उपोषणास बसले नाही.
(२) पिंपळवाडी धरणाचे काम २००४ मध्ये पूर्ण झाले आहे. डावा कालवा ९ कि.मी. व वितरिका ११ कि.मी. आहे. उजवा कालवा व त्यावरील वितरिकेचे काम पूर्ण आहे. डावा कालवा पूर्ण आहे. तथापि डाव्या वितरिकेचे काम प्रगतीत आहे.

पूर्ण झालेल्या कालव्यातून सिंचनासाठी पाणी सोडण्यात आले असता कालव्याच्या काही भागातून पाझर सुरु झाल्याने ग्रामस्थांच्या तक्रारी नुसार पाणी पुरवठा बंद करण्यात आला.
(३) सदर ग्रामस्थांकडून पिण्यासाठी पाणी मागणी आलेली नाही. शेतीसाठी पाणी पुरवठा करण्यासाठी कालव्याची साफ सफाई करणे व गाळ काढणेचे काम विभागाच्या यांत्रिकी संघटनेमार्फत प्रगतीत आहे. या व्यतिरीक्त कोकण प्रदेशातील जमिनिच्या सच्छिद्र भुस्तरामुळे सिंचनासाठी सोडलेल्या पाण्यामुळे कालव्यातून होणा-या पाझराचा प्रतिबंध करणेसाठी आवश्यक उपाययोजना करण्याबाबत क्षेत्रीय स्तरावर कार्यवाही सूरू आहे.
(४) प्रश्न उदभवत नाही.

-----------------

## भंडारा जिल्हयात बालमजूरी विरोधी कायद्याची अंमलबजावणी जिल्हा प्रशासनाकडून योग्यप्रकारे होत नसल्याबाबत

**(५७) * ४५१७३ श्री.राजेश काशीवार (साकोली), श्री.चरण वाघमारे (तुमसर), श्री.रामचंद्र अवसरे (भंडारा) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भंडारा जिल्हयात निरनिराळ्या व्यवसायात बालमजुरांचा सर्रास वापर करण्यात येत असून बालमजूरी विरोधी कायद्याची अंमलबजावणी जिल्हा

प्रशासनाकडून योग्यप्रकारे होत नसल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बालमजुरी विरोधी कायद्याची प्रभावी अंमलबजावणी होण्याच्या दृष्टीने शासनाने राज्यात कोणती मोहीम राबविली आहे,

(३) असल्यास, तसे निर्देश जिल्हा प्रशासनाला देण्यात आले आहेत काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता :** (१) हे खरे नाही.

(२) राज्यात बालमजुरी विरोधी कायद्याची प्रभावी अंमलबजावणी होण्याच्या दृष्टीने जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली कृतीदलाची स्थापना करण्यात आली असून त्यांच्या मार्फत धाडसत्रांचे आयोजन करण्यात येते. सन २०१३ ते सन २०१५ या कालावधीत एकूण ३०५ धाडसत्रांचे आयोजन करण्यात येऊन ११२८ इतक्या बाल कामगारांची सुटका करण्यात आलेली आहे.

भंडारा जिल्हयात सन २०१४ ते फेब्रुवारी २०१६ पर्यंत १०३ आस्थापनांना भेटी देण्यात आलेल्या असून सदर भेटीमध्ये १४ वर्षाखालील एकही बालक काम करताना आढळून आलेला नाही.

(३) प्रश्न उद्‍भवत नाही.

(४) प्रश्न उद्‍भवत नाही.

-----------------

## गवशी (ता.राधानगरी, जि.कोल्हापूर) येथील गायरान जमिनीमध्ये अतिक्रमण करुन शेततळे बांधल्याबाबत

**(५८) * ४६७१३ श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) : तारांकित प्रश्न क्रमांक ३५३५२ ला दिनांक ९ डिसेंबर, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:**
सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गवशी (ता.राधानगरी, जि.कोल्हापूर) येथील गायरान जमिनीमध्ये श्री.सर्जेराव पाटील यांनी अतिक्रमण करुन शेततळे बांधले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कृषी विभागाने सदरील शेततळ्याला मंजूरी देऊन शासनाच्या लाखो रुपयांचा गैरवापर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तत्कालीन तालुका कृषी अधिकारी, मंडळ कृषी सेवक यांच्यावर शासनाने कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) या प्रकरणाची चौकशी करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**दमणगंगा पिंजाळ राष्ट्रीय नदी जोड प्रकल्पाबाबत**

**(५९) * ४०९२७ श्री.छगन भुजबळ (येवला), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अजित पवार (बारामती), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयदत्त क्षीरसागर (बीड), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), प्रा. वर्षा गायकवाड (धारावी) : तारांकित प्रश्न क्रमांक ३०६७२ ला दिनांक ७ डिसेंबर, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दमणगंगा पिंजाळ राष्ट्रीय नदी जोड प्रकल्पाचा सामंजस्य करार अंतिम करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने दिनांक १७ एप्रिल २०१५ रोजी वा त्यासुमारास केंद्र शासनास संमती दिल्याची निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) महाराष्ट्र-गुजरात सीमेवरील दमणगंगा व पार खोऱ्याच्या पाणलोट क्षेत्रातील संपूर्ण पाण्यावर महाराष्ट्राचा हक्क अबाधित राहण्यासाठी लोकप्रतिनिधींनी माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान काही सूचना केलेल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच लोकप्रतिनिधींच्या सुचनांबाबत कार्यवाही केल्याशिवाय दमणगंगा पिंजाळ सामंजस्य करार अंतिम केला जावू नये तसेच दमणगंगा आणि पार खोऱ्यातील महाराष्ट्राच्या हद्दीतील पाण्याचा सुधारित अभ्यास करुन सुधारीत पाणी उपलब्धता निश्चित करण्याबाबत लोकप्रतिनिधींनी माहे ऑगस्ट व ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान शासनाकडे मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, प्रश्न भाग (१), (२) व (३) बाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) नाही. महाराष्ट्रास दमणगंगा-पिंजाळ नदीजोड योजना राबवण्यात स्वारस्य आहे. या योजनेच्या सामंजस्य कराराचा मसुदा तयार करणेत यावा असे जलसंसाधन मंत्रालयास व राष्ट्रीय जलविकास अभिकरणास कळविले होते.

(२) होय.

(३) होय.

(४) राष्ट्रीय जल विकास अभिकरणाने दमणगंगा पिंजाळ व नार-पार-तापी-नर्मदा या दोन्ही नदी जोड योजनांचे सविस्तर प्रकल्प अहवाल तयार केलेले आहेत. दमणगंगा पिंजाळ योजनेच्या प्रकल्प अहवालाची छाननी करुन त्यावरील अभिप्राय राष्ट्रीय जल विकास अभिकरणास दिनांक २३/०४/२०१५ रोजी पाठविले आहेत. नार-पार-तापी-नर्मदा योजनेचा प्रकल्प अहवाल दिनांक ०२/०९/२०१५ रोजी प्राप्त झाला असून त्याची छाननी झाली आहे. या नदी खो-यातील विविध प्रवर्गाची पाणी मागणी विचारात घेऊन जलनियोजनाबाबतचा धोरणात्मक निर्णय लवकर घेण्यात येईल.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील बालगृहातील व निरिक्षणगृहातील कर्मचाऱ्यांना माहे जुलै, २०१५ पासून वेतन न मिळाल्याबाबत

**(६०) * ४३६४२ श्री.अजित पवार (बारामती), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री. नरहरी झिरवाळ (दिंडोरी) :** सन्माननीय **महिला व बाल विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महिला बालविकास अंतर्गत राज्याच्या महिला व बालविकास विभागामार्फत राज्यात चालविल्या जाणाऱ्या ४४ बालगृहातील/निरिक्षणगृहातील कर्मचाऱ्यांना माहे जुलै, २०१५ पासून वेतन मिळाले नसल्याची बाब जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ८ महिन्यांपासून वेतन मिळाले नसल्याने या कर्मचाऱ्यांवर उपासमारीची वेळ आली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या कर्मचाऱ्यांची ८ महिन्याचे थकीत वेतन, कर्मचाऱ्यांना शासकीय दर्जा, दरमहा सेवार्थ अथवा बी.डी.एस.मार्फत वेतन व भविष्यनिर्वाह निधीची रक्कम भरण्याच्या मागणीसाठी दिनांक २६ जानेवारी, २०१६ रोजी सांगली जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषण केले होते, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, कर्मचाऱ्यांच्या या मागण्यांनुसार काय कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२) सदर स्वयंसेवी निरीक्षणगृहांना वेळोवेळी अनुदान अदा करण्यात आले असून चालू आर्थिक वर्षात माहे नोव्हेंबर, २०१५ पर्यंत रू.५.६७ कोटी इतके अनुदान अदा करण्यात आले असून दि.०३.०२.२०१६ रोजी रू.४.१५ कोटी एवढे अनुदान असे एकूण रू.९.८२ कोटी अनुदान उपलब्ध करण्यात आलेले आहे.
(३) उपोषण करण्याबाबत पूर्वसुचना मिळाली होती. मात्र विनंतीनंतर उपोषण मागे घेण्यात आले आहे.
(४) स्वयंसेवी संस्थामार्फत चालविण्यात येणाऱ्या निरीक्षणगृहातील कर्मचाऱ्यांचे थकित असलेले वेतन देण्याबाबत प्रश्न भाग २ मध्ये स्पष्ट करण्यात आलेनुसार कार्यवाही करण्यात आलेली आहे. निरीक्षणगृहातील कर्मचारी हे स्वयंसेवी संस्थांचे कर्मचारी आहे.या कर्मचाऱ्यांच्या वेतनासाठी शासनाकडून १०० टक्के निधी सहाय्यक अनुदानाच्या स्वरूपात वितरीत करण्यात येतो.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पुणे जिल्हयात आदिवासी भागात जिल्हा परिषद व सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत करण्यात आलेली कामे निकृष्ट दर्जाची असल्याबाबत

**(६१) * ४७१५५ श्री.राहूल कुल (दौंड), श्री.योगेश टिळेकर (हडपसर) : दिनांक ८ डिसेंबर, २०१५ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ४३ मधील प्रश्न क्रमांक ९७०५ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे जिल्हयात आदिवासी भागात जिल्हा परिषद व सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत करण्यात आलेल्या कामांमध्ये ९२ कामे निकृष्ट दर्जाची असल्याचा

अहवाल पुणे अभियांत्रिकी महाविद्यालय आणि गोखले इंस्टिट्यूट यांनी माहे जानेवारी, २०१६ वा त्या दरम्यान शासनास दिला असून निकृष्ट काम करणाऱ्या ठेकेदार व संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याचे आदेश मा.पालकमंत्री, पुणे यांनी दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मा.पालकमंत्री, पुणे यांनी दिलेल्या आदेशानुसार निकृष्ट काम करणाऱ्या अधिकाऱ्यावर व ठेकेदारांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे : (**१) ते (३) हे खरे नाही,

सन २०११-१२ व २०१२-१३ या वर्षामध्ये पूर्ण झालेल्या ९२ कामांच्या तपासणीकरीता मा.पालकमंत्री, पुणे यांच्या आदेशान्वये जिल्हाधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २६.५.२०१४ च्या पत्रान्वये जिल्हा परिषदेकडील गोखले इंस्टिट्युटला आदेश देण्यात आले होते.

गोखले इंस्टिट्युटच्या तपासणी अहवालामध्ये ९२ कामांपैकी १७ रस्त्यांच्या पृष्ठभागाला जादा प्रमाणात खड्डे पडल्याचे नमूद केले आहे. त्यास अनुसरुन संबंधीत एजन्सीला सदर १७ रस्त्यांची दुरुस्ती करुन देण्याबाबत जिल्हा परिषदेमार्फत नोटीसा बजावण्यात आलेल्या आहेत. तसेच त्यांच्या कामापोटी असणारे सुरक्षा ठेव व अनामत रक्कम प्रलंबित ठेवण्यात आलेले आहेत.

९२ कामांमध्ये सार्वजनिक बांधकाम विभागाकडील रस्त्यांचा समावेश नाही.

-----------------

## साजेगांव पिंप्री (खु.) (ता.दारव्हा, जि.यवतमाळ) गट ग्रामपंचायत येथे विहीरींच्या वाटपात झालेला गैरव्यवहार

**(६२) * ४७७७९ श्री.मदन येरावार (यवतमाळ) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) साजेगाव पिंप्री (खु.) (ता.दारव्हा, जि.यवतमाळ) येथील गट ग्रामपंचायत येथे सन २०१३-२०१४ मध्ये महाराष्ट्र राज्य ग्रामीण रोजगार हमी योजनेतंर्गत १३ सिंचन विहीरींचे लक्षांक प्राप्त होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणात तत्कालीन सचिव, सरपंच यांनी पंचायत समितीच्या महाराष्ट्र राज्य ग्रामीण रोजगार हमी योजनेचे साहयक कार्यक्रम

अधिकारी, कंत्राटी तांत्रिक कृषी अधिकारी, शा.अ. बांधकाम व तत्कालीन गटविकास अधिकारी यांच्याशी संगनमत करून सिंचन विहीरीचे लक्षांक नसतांना १३ सिंचन विहीरीचे आर्थिक देवाण घेवाण करून नियमबाहय वाटप केले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तत्कालीन सरपंच,सचिव यांनी अतिरिक्त १३ विहीरींचे नियमबाह्य लक्षांक वाटप केल्याची तक्रार श्रीमती मंजु हितेश राठोड उपसरपंच, ग्रामपंचायत साजेगांव यांनी दिनांक ४ डिसेंबर, २०१५ रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, यवतमाळ तथा वि.तहसिलदार, दारव्हा यांना केली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणाबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, यवतमाळ यांनी तात्काळ दखल घेवून चौकशीचे आदेश देवून अद्यापपर्यंत कोणत्याही प्रकारची चौकशी करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) गट ग्रामपंचायतीला भूजल सर्वेक्षण विभागाने दिलेल्या सुत्रानुसार ४२ विहिरींचा लक्षांक निश्चित होतो. सन २०१३-१४ या वर्षाकरिता विहिरीच्या कामाचा शेल्फ तयार करण्याकरिता पंचायत समिती दारव्हा कडून ग्रामपंचायतीला १३ विहिरींच्या शेल्फबाबत सूचना देण्यात आल्या होत्या.

(२) लाभार्थ्यांना प्रशासकीय मान्यता देताना विहित अटी शर्तीचे पालन करण्यात आले नाही.

(३) हे खरे आहे.

(४) हे खरे नाही.

सदर प्रकरणी पंचायत समिती स्तरावरुन चौकशी करण्यात आली आहे.

(५) सदर प्रकरणी जबाबदार असणाऱ्या तत्कालीन गटविकास अधिकारी तथा कृषी अधिकारी, तत्कालीन ग्रामसेवक यांचेवर शिस्तभंग विषयक कारवाई करण्यात येत आहे. संबंधित सहायक कार्यक्रम अधिकारी यांचेवर मग्रारोहयो अधिनियम २००५ नुसार कारवाई करण्यात येत आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## निगडोली (ता.खोपोली, जि.रायगड) गावानजीक असलेल्या जुना फरशी पुलाची झालेली दुरवस्था

**(६३) * ४४६६० श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) निगडोली (ता.खोपोली, जि.रायगड) गावानजीक असलेल्या जुन्या फरशी पुलाची अवस्था दिवसेंदिवस अत्यंत बिकट झाल्यामुळे या मार्गावरुन प्रवास करताना विद्यार्थ्यांना व नागरिकांना जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागतो, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत तेथील स्थानिक लोकप्रतिनिधींनी सार्वजनिक बांधकाम विभाग, अलिबाग तसेच शासनाकडे गेली दोन वर्षापासून सतत दुरुस्तीबाबत मागणी करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या पुलाची दुरुस्ती न करण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, प्रश्न भाग (१) मधील पुलाची दुरुस्ती केव्हा तातडीने करण्यात येणार आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) ते (४) प्रश्नांकित पूल हा खोपोली तालुक्यात नसून खालापूर तालुक्यात आहे. प्रश्नांकित जुन्या पुलाची उंची कमी असल्याने पावसाळ्यात या पुलावरुन पाणी जात असल्याने वहातुक करणे गैरसोईचे होते. सद्यस्थितीत जुन्या पुलावरुन वहातुक चालू आहे. तसेच या जुन्या पुलाशेजारी प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेअंतर्गत नवीन पुलाचे काम मंजूर असून, काम प्रगतीत असल्याने जुन्या पुलाची दुरुस्ती करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## दहीगाव (ता.पाचोरा, जि.जळगाव) धरणातील गाळ काढण्याबाबत

**(६४) * ४८४५५ श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दहीगाव (ता.पाचोरा, जि.जळगाव) धरण कोरडे पडल्याने नंद्रासह, माहिजी, कुरंगी, लासगाव, भातखेडा, हनुमंतखेडे, पिंप्री, दहिगाव सह १० ते १२ गावांना १५ दिवसाआड सुद्धा पाणी मिळत नसून माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच उक्त धरणातील गाळ गेल्या अनेक वर्षापासून काढण्यात न आल्याने पाणी साठवण क्षमता कमी झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू धरणातील गाळ काढण्याकरिता तेथील ग्रामस्थांनी व लोकप्रतिनिधींनी संबधित अधिकाऱ्याकडे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनस्तरावर कोणती कार्यवाही सुरु आहे वा करण्यात आली आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन : (**१) हे अंशत: खरे आहे.

(२) गिरणा प्रकल्पांतर्गत दहीगांव हा गिरणा धरणाच्या खालील बाजूस १३२ किमी अंतरावर उन्नयी बंधारा असून त्याची क्षमता ४३ दलघफू आहे. बंधाऱ्यातील गाळाचे सर्वेक्षण अद्याप केलेले नाही.

(३) व (४) दहिगाव बंधाऱ्यातील गाळ काढण्यासंबधी स्थानिक शेतकऱ्यांनी संबधित क्षेत्रिय अधिकाऱ्यांकडे मागणी केलेली आहे. मागणी नुसार त्यांना परवानगी देण्यात आलेली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राष्ट्रीय कुष्ठरोग नियंत्रण योजना गावपातळीवर संथ गतीने राबविण्यामुळे कुष्ठरोगाचे प्रमाणे वाढत असल्याबाबत

**(६५) * ४८४२६ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.विजय काळे (शिवाजीनगर), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कुष्ठरोगांचा फैलाव कमी झाल्यानंतरही गेल्या १० वर्षात कुष्ठ रोगाचे रुग्ण सापडत असून सन २००९ पासून लहान मुलांमध्ये कुष्ठरोगाची संख्या वाढत असल्याचे माहे फेब्रुवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राष्ट्रीय कुष्ठरोग नियंत्रण योजना गावपातळीवर संथ गतीने राबविल्यामुळे कुष्ठ रोग्यांचे प्रमाण वाढत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, लहान मुलांमधील कुष्ठरोगाची वाढती संख्या लक्षात घेता गाव पातळीवर कुष्ठरोगाचे उच्चाटन होण्यासाठी ठोस उपाययोजना करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करीत आहे,

(४) अद्याप कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे नाही.

राज्यात कुष्ठरोगाचे रुग्ण सापडतात परंतु लहान मुलांमध्ये कुष्ठरोगाचे प्रमाण सध्या माहे जानेवारी २०१६ अखेर एकूण १२७९४ नविन शोधलेल्या कुष्ठरुग्णांमध्ये मुलांची संख्या १४५९ असून प्रमाण ११.४० इतके आहे.

**वर्षनिहाय निर्देशांक दाखवणारा तक्ता**

| निर्देशांक | नविन शोधलेल्या कुष्ठरुग्णांमध्ये मुलांची संख्या | नविन शोधलेल्या कुष्ठरुग्णांमध्ये मुलांचे शेकडा प्रमाण |
|---|---|---|
| २००९-१० | १७३३ | ११.५० |
| २०१०-११ | १९१२ | १२.३४ |
| २०११-१२ | २३२८ | १३.०१ |
| २०१२-१३ | २३४१ | १२.५१ |
| २०१३-१४ | २०८३ | १२.७० |
| २०१४-१५ | २०४५ | १२.४६ |
| २०१५-जाने, १६ | १४५९ | ११.४० |

वरील तक्त्यावरुन मागील पाच वर्षापासून लहान मुलांमध्ये कुष्ठरोगाची संख्या कमी होत असल्याचे आढळून येते.

(२) हे खरे नाही.

राष्ट्रीय कुष्ठरोग निर्मुलन कार्यक्रम केंद्र शासन अनुदानीत असून कार्यक्रमाचे सर्वसाधारण आरोग्य सेवेमध्ये एकत्रिकरण झाले आहे. महाराष्ट्र राज्यात हा कार्यक्रम राज्य शासन, जिल्हा परिषदा, महानगरपालिका, नगरपालिका आणि स्वयंसेवी संस्था यांचे मार्फत राबविण्यात येत आहे. ग्रामीण भागात सर्वसाधारण आरोग्य सेवेतील अधिकारी व कर्मचारी यांचे नियमित घरभेटी व नियमीत कार्यक्रमाच्या वेळी हा कार्यक्रम राबविण्यात येतो. त्यांचप्रमाणे प्रशिक्षीत आशावर्कर मार्फत (गावपातळीवरील) संशयीत कुष्ठरुग्ण शोधण्याचे कार्य करण्यात येते.

(३) हे खरे नाही.

कुष्ठरोगाचे उच्चाटन होण्यासाठी उपाययोजना करण्यासाठी सर्वसामान्य जनतेला कुष्ठरोग विषयक शास्त्रीय ज्ञान प्राप्त होवून कुष्ठरुग्णाने स्वत:हून तपासणीसाठी जवळच्या आरोग्य केंद्रात यावे या करीता आरोग्य शिक्षण व जनजागृती कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. त्यामध्ये रॅली, शालेय प्रश्नमंजुषा, आरोग्य कर्मचारी व वैद्यकिय अधिकारी यांची कार्यशाळा, समाजातील विविध स्तरासाठी गटचर्चा या बरोबरच कुष्ठरुग्णांसाठी विकृती शिबीरे, आरोग्य कर्मचारी व वैद्यकिय अधिकारी यांचे कुष्ठरोग प्रशिक्षण सत्र, आरोग्य कर्मचाऱ्यांव्दारे आरोग्य शिक्षणाधारित घरोघर व्यक्ती संपर्क अभियान राबविणे व मोक्याच्या ठिकाणी प्रदर्शने, बॅनर्स पोर्स्टर्स, होर्डिंग, भिंतीवरील म्हणी, हस्तपत्रिका वाटप करणे इ. उपक्रम घेतले जातात.

केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनेनुसार महाराष्ट्र राज्यात दरवर्षी माहे ऑक्टोबर व जानेवारी फेब्रुवारी विशेष कुष्ठरोग शोध व उपचार मोहिम घरोघर भेटीव्दारे राबविण्यात येते.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## खतिजापूर लघु पाटबंधारे प्रकल्प (जि.अमरावती) कॅनलवरील झाडांची अवैध वृक्षतोड केल्याबाबत

**(६६) * ४९०५३ डॉ.सुनिल देशमुख (अमरावती), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती येथील पाटबंधारे उपविभागातील एका मजूरांने परतवाडा नजीकच्या खतिजापूर येथील लघु प्रकल्पांच्या कॅनलवरील सुमारे ५० पेक्षा अधिक झाडांची अवैद्यरीत्या तोड करुन ती परस्पर विकली असून यासंदर्भात एका शेतकऱ्यांने तहसलिदार, अचलपूर यांच्याकडे तक्रार केली असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर तक्रारीच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी दोषीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय.

(२) या प्रकरणी विभागीय स्तरावर चौकशी करण्यात आली असून तक्रारीत तथ्य आढळून आले नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मौजे खडका (ता.महागांव, जि.यवतमाळ) ग्रामपंचायत मध्ये लाखो रुपयांचा झालेला गैरव्यवहार

**(६७) * ५१८३० श्री.राजेंद्र नजरधने (उमरखेड) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदर्श ग्रामपंचायत मौजे खडका (ता.महागांव, जि.यवतमाळ) मध्ये सरपंच व सचिव यांनी संगनमताने १० लाख रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचे सिध्द होऊनही मुख्य कार्यपालन जिल्हा परिषद यवतमाळ यांच्या आदेशावरुन विस्तार अधिकारी पंचायत समिती महागांव यांनी दिनांक २७ जुलै, २०१५ रोजी फक्त ग्रामसेवकांच्या नावानेच एक लाख अठ्ठेचाळी हजार नऊशे अकरा रुपयाची चुकीची तक्रार महागांव पोलीसात दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच याबाबत लोकप्रतिनिधीनी दिनांक ९ डिसेंबर, २०१५ रोजी व दिनांक २२ डिसेंबर, २०१५ रोजी च्या सुमारास मा.ग्रामविकास मंत्री यांना निवेदन दिल्या नंतरही जिल्हा परिषद यवतमाळ यांच्या मार्फत कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय, अशंत: खरे आहे.

एकूण अपहारीत रक्कम रु.९,५२,३७४/-इतक्या रकमेपैकी तत्कालीन सचिव श्री.व्ही. ए. बेदरकर यांचेवर रु.१४८९११/- इतक्या रकमेच्या अपहाराबाबत फौजदारी गुन्हा दिनांक २८.७.२०१५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(२) हे खरे नाही.

(३) शाखा अभियंता यांचा मुल्यांकन अहवाल व विस्तार अधिकारी (पंचा) यांनी केलेल्या चौकशीनुसार अपहाराची अतिरिक्त रक्कम रु. ८०३४६३/- इतकी निश्चित करण्यात आली आहे. सदरहू अतिरिक्त अपहारीत रक्कम रु. ८०३४६३/- बाबत तत्कालीन सचिव श्री.व्ही.ए. बेदरकर व सरपंच श्र. प्रकाश श्रीराम जमदाडे यांचेवर प्रत्येकी रु.४०१७३२/- इतक्या अपहारीत रक्कमेबाबत दिनांक ९/२/२०१६ व दिनांक १५/३/२०१६ रोजीच्या पत्रान्वये पोलिस स्टेशन महागाव येथे फौजदारी गुन्हा दाखल करण्याबाबत कळविण्यात आले आहे. श्री.व्ही.ए. बेदरकर, सचिव, ग्रामपंचायत, खडका यांना निलंबित करुन त्यांचेवर खाते चौकशी प्रस्तावीत केली आहे. तसेच श्री.बेदरकर यांचेकडून रू.१,४७,९११/- रक्कम वसूल करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे श्री.प्रकाश श्रीराम जमदाडे, सरपंच, ग्रामपंचायत खडका यांचेविरुध्द महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५८ चे कलम ३९ (१) अन्वये कार्यवाहीस्तव चौकशीसाठी विभागीय आयुक्त, अमरावती यांची परवानगी प्राप्त झाली असून पुढील कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राजगड व वांगणी (ता.वेल्हा, जि.पुणे) खोऱ्यात जलयुक्त शिवार योजनेंतर्गत बंधाऱ्यांच्या कामाबाबत

**(६८) * ४९८६८ श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वेल्हा तालुक्यातील राजगड व वांगणी खोऱ्यात जलयुक्त शिवार योजनेंतर्गत चार सिमेंटचे बंधारे बांधले जाणार असून केवळ एकाच बंधाऱ्याची पायाभरणी करण्यात आली असून इतर तीन बंधाऱ्याच्या कामास अद्याप सुरुवात झालेली नसल्याचे दिनांक १७ डिसेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या बंधाऱ्यासाठी मंजूर असलेला रु. ५५ लाखाचा निधी शासनाकडे पडून असून त्यावर शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय, हे खरे आहे.

दि.१७ डिसेंबर २०१५ वा त्यासुमारास एकाच बंधा-याची पायाभरणी झाली होती. माहे डिसेंबर मध्ये नालापात्रामध्ये पाणी असल्याने काम सुरु करता आले नव्हते. तथापि डिसेंबरच्या शेवटच्या आठवड्यामध्ये कामास सुरवात करण्यात येऊन जानेवारी २०१६ मध्ये वांगणी खो-यातील दोन व राजगड खो-यातील मौजे पिंपरी येथील एक अशा तीन सिमेंट नाला बंधा-याची कामे पुर्ण झालेली आहेत. व राजगड खो-यातील उर्वरित एका बंधा-याचे काम ७०% पुर्ण झाले आहे.
(२) उपरोक्त नमूद केलेल्या चार सिमेंट बंधाऱ्यासाठी मंजूर केलेल्या रू.५८.४६ लाख निधीपैंकी रू.३८.८६ लाख निधी खर्च करण्यात आला असून उर्वरित निधी मार्च २०१६ अखेर खर्च करण्यात येणार आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बेबंळा प्रकल्प अंतर्गत मुख्य कालवा व वितरीकेची कामे विहीत कालावधीत पूर्ण करण्याबाबत

**(६९) * ४९६०३ प्रा.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बेबंळा प्रकल्पा अंतर्गत मुख्य कालवा व वितरीकेची कामे निवीदा व्दारे करण्यात येत असुन कंत्राटदार अजुनही कामे विहीत कालावधीत पुर्ण करीत नसल्याचे दिनांक २५ ऑक्टोबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, निवीदा व कंत्राटदाराचे काम पुर्ण करण्याचा कालावधी संपुनही अतिरीक्त काम वाढीव मुदतीमध्ये पुर्ण न करणाऱ्या कंत्राटदारांची संख्या किती आहे,

(३) असल्यास, मुख्य कालवा व वितरीकेची कामे विहीत कालावधीत पुर्ण न करणाऱ्या कंत्राटदारावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) हे खरे नाही.

तथापी भूसंपादन व निधीच्या अडचणींमुळे संबंधित ठेकेदारांना कालवा व वितरीकेची कामे पूर्ण करण्यासाठी मुदतवाढ देण्यात आलेली आहे.
(२) बेंबळा कालवे विभागांतर्गत २००८-०९ पासून सिंचन क्षमता निर्मितीच्या दृष्टीने ११६ कामे निविदेद्वारे करण्यांत येत असून त्यापैकी ९८ कंत्राटदारांना वर नमूद केलेनुसार भूसंपादन व निधीच्या अडचणींस्तव वाढीव मुदतवाढ देण्यांत आलेली आहे. सदरहू कामे प्रगतीपथावर आहेत.
(३) भूसंपादन व निधीच्या अडचणीमुळे ही कामे पुर्ण होण्यास विलंब झालेला आहे. त्यामुळे संबंधित कंत्राटदारावर कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## हिंगोली जिल्हा परिषदेच्या सोलर पथदिवे खरेदीच्या निविदा प्रक्रियेत झालेली अनियमितता

**(७०) * ५१३९८ श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलर पथ दिव्याकरीता शासनाच्या डी.जी.एस.ॲन्ड. डी.चे दर करारात सोलरपथ दिव्याची किंमत प्रति नग रु.१२,८००/- एवढी असून याच सोलर पथ दिव्यांकरीता जिल्हा परिषद हिंगोलीच्या कृषी विभागामार्फत काढलेल्या निविदेत प्रति नगाची किंमत रु.१८,९००/ म्हणजे रु.६,१००/- एवढ्या वाढीव रकमेची आहे, हे खरेआहे काय,
(२) असल्यास, सदर निविदा भरणेस इतरांना सर्वसमावेशक संधी प्राप्त न झाल्याची तक्रारी असून सदर सोलर पथदिव्याच्या निविदा प्रक्रियेत गैरव्यवहार झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या निविदा प्रक्रियेतील किंमतीच्या फरकामुळे शासनाच्या पैशाचे नुकसान होवू नये याकरीता निविदा प्रक्रिया रद्द करुन फेरनिविदा प्रक्रिया घेण्याकरीता स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ८ फेब्रुवारी, २०१६ अन्वये मा.जिल्हाधिकारी, हिंगोली,मुख्यकार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद,हिंगोली लेखाधिकारी, जिल्हा परिषद, हिंगोली यांना निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय.

(२) नाही.

(३) होय.

(४) सदर तक्रारीचे अनुषंगाने संबंधित पुरवठादारास प्रत्यक्ष बोलावून फेर वाटाघाटी अंती नवीन प्राप्त झालेल्या डी.जी.एस. ॲन्ड डी. च्या रू. १२८००/- + ५% विक्रीकर प्रति नग दराने सौरपथ दिव्यांचा पुरवठा करण्यास विचारले असता त्यांनी लेखी सहमती दर्शविली आहे. त्यानुसार पुरवठादारास कोणत्याही प्रकारचे देयक अद्याप पर्यंत अदा केलेले नाही. त्यामुळे शासनाचे कोणत्याही प्रकारचे नुकसान झालेले नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सामदा बुज (ता.सावली, जि.चंद्रपूर) येथील 'बिपीएलचे' बनावट दाखले बनवणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत

**(७१) * ३९७९५ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सामदा बुज (ता.सावली, जि.चंद्रपूर) येथील गोरगरीब नागरिकांना शासनाच्या विविध योजना मिळवून देण्याच्या नावाखाली एका नेत्याने अनेक लोकांना आमिष दाखवून फसवणूक केल्याची माहिती निर्देशनास येणे, याच नेत्यांनी सामदा बुज येथील ग्रामविस्तार अधिकारी यांचे सही व शिक्का मारून दोन महिलांना बनावट बिपीएलचा दाखला दिल्यामुळे या महिलांनी राष्ट्रीय कुटूंब

अर्थसहाय योजने करीता तहसिल कार्यालय, सावली (जि.चंद्रपूर) येथे अर्ज केला असता अर्ज छाननीच्या वेळेस बनावट दाखले निदर्शनास आल्यांनतर सुध्दा अध्यापही या बाबत तहसिलदार, सावली यांनी बनावट दाखल्या प्रकरणी अद्यापही कोणावरही कोणतीच कार्यवाही केलेली नसल्याची माहिती दिनांक २५ जानेवारी, २०१६ रोजी निर्देशनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या गंभीर प्रकरणाची तातडीने चौकशी करून संबधितावर फौजदारी स्वरूपाची कार्यवाही करण्याबाबत लोकप्रतिनिधीनी पत्र क्र.विव/ब्रम्ह/६९९/२०१५ दिनांक २८ सप्टेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास जिल्हाधिकारी, चंद्रपूर आणि मुख्य कार्यपालन अधिकारी, जिल्हा परिषद, चंद्रपूर यांना दिले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची चौकशी करण्यात आलेली आहे काय व चौकशीअंती काय आढळून आले,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय. राष्ट्रीय कुटुंब अर्थसहाय योजनेकरीता दोन महिलांनी बनावट बी.पी.एल. चा दाखला दिल्याचे तहसिलदार, सावली यांचे निदर्शनास आले आहे. तथापि, तहसिलदार, सावली यांनी पोलीस निरीक्षक, सावली यांना पुढील कार्यवाही करण्याकरीता दिनांक १२.०१.२०१६ चे पत्रान्वये कळविले असल्याने त्यांनी कोणतीच कार्यवाही केली नाही, ही बाब खरी नाही.

(२) होय.

(३) होय.

तसेच सदर प्रकरणी गट विकास अधिकारी सावली यांनी चौकशी केलेली असून यामध्ये श्री.सुधीर देवीदास निकुरे, डाटा एंट्री ऑपरेटर, श्री.देवानंद पाल, तत्कालीन सरपंच, ग्रामपंचायत, सामदा बुज व संबंधित अर्जदार श्रीमती मंगला संतोष खोब्रागडे व श्रीमती वैशाली रमेश कोहळे हे दोषी आढळून आलेले आहेत.

(४) श्री.सुधिर देवीदास निकुरे, डाटा एंट्री ऑपरेटर, ग्रामपंचायत, सामदा बुज यांचेविरुध्द सावली, पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आलेला असून श्री. देवानंद पाल, तत्कालीन सरपंच, अर्जदार श्रीमती मंगला संतोष खोब्रागडे व श्रीमती वैशाली रमेश कोहळे यांचेवर सुध्दा कारवाई करणेस पोलीस स्टेशन

सावली यांचेकडे चौकशी अहवाल सदर गुन्ह्याचा तपास करण्याकरिता पुरविण्यात आला असून त्या अनुषंगाने ठाणेदार, पोलीस स्टेशन सावली यांचेकडून तपास कार्य सुरु आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## वनशास्त्र पदवी अभ्यासक्रमांच्या पदवीधर विद्यार्थ्यांना सेवा संधी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(७२) * ४८६०३ श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.राजन साळवी (राजापूर), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री. ओमप्रकाश कडू (अचलपूर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अकोला व डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ दापोली अंतर्गत सुमारे ३० वर्षापासून सुरू करण्यात आलेल्या वनशास्त्र पदवी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना वन विभागातील सेवांच्या संधी अपुऱ्या असल्याने वाढलेल्या बेरोजगारी प्रकरणी सेवा संधी उपलब्ध करुन देण्यास पदवीधर विद्यार्थ्यांनी चंद्रपूर येथे उपोषण केले, हे खरे आहे काय,

(२) वनशास्त्र पदवीधारक विद्यार्थ्यांना राज्याच्या वनखात्याचे सेवेत सामावून घेण्यासाठी केंद्र शासनाचे आदेश तसेच राष्ट्रीय वन आयोगाची शिफारस आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, वनसंरक्षण, पर्यावरण पर्यटनासारख्या बाबी लक्षात घेता वनशास्त्र पदवीधारक विद्यार्थ्यांच्या ज्ञानाचा उपयोग होण्यासाठी वनखात्याचे सेवेत सदर विद्यार्थ्यांना सेवा संधी देण्यास शासनाचे काय धोरण आहे,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाकडून काय कार्यवाही करण्यात येत आहे ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) होय.

(२) वनशास्त्र पदवीधारक विद्यार्थ्यांना राज्याच्या वनखात्याचे सेवेत सामावून घेण्यासाठी केंद्र शासनाचे कोणतेही आदेश नाहीत.

राष्ट्रीय वन आयोगाने, वनधिका-याचे निवडीमध्ये वनशास्त्र या अभ्यासक्रमाना प्राधान्य देण्याचा विचार व्हावा आणि वनशास्त्र हा एक विषय

स्पर्धा परिक्षेमध्ये असावा अशी शिफारस केली आहे. तसेच वनक्षेत्रपाल यांची निवड वनशास्त्र पदवीधारकामधुन करण्याची सुध्दा शिफारस केली आहे.
(३) व (४) महसूल व वन विभाग, अधिसूचना, दि.०५.०२.२०१५ अन्वये वनक्षेत्रपाल गट-ब राजपत्रित या संवर्गात सरळसेवेने निवड करण्याकरिता वनशास्त्र पदवीधारकाकरिता ५ टक्के जागा आरक्षित केलेल्या आहेत.

-----------------

## जायकवाडी (ता.नेवासा, जि.अहमदनगर) बॅकवॉटरच्या उपशावरील निर्बंध काढून टाकण्याबाबत

**(७३) * ४९१०३ श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जायकवाडी (ता.नेवासा, जि.अहमदनगर) बॅकवॉटरचे हक्काचे पाणी शेतकऱ्यांना द्यावे तसेच बॅकवॉटरच्या उपसावरील निर्बंध शासनाने उठवावेत अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.ऊर्जा मंत्री व मा.जलसंधारण मंत्री यांच्याकडे नुकतीच माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर मागणीनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय.

स्थानिक लोकप्रतिनिधींनी दि. ०९/१२/२०१५ रोजीच्या निवेदनाव्दारे “जायकवाडी धरणाच्या बॅकवॉटरचे शेतक-यांना हक्काचे पाणी मिळण्याबाबतची मागणी मा.मंत्री, जलसंपदा यांच्याकडे केलेली आहे.
(२) यावर्षी जायकवाडीच्या जलाशयामध्ये तुटीचा पाणीसाठा झाला असल्यामुळे समन्यायी पाणी वाटपासाठी महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाच्या दि.१९/०९/२०१४ च्या आदेशांची अंमलबजावणी करण्यासाठी जायकवाडीच्या उर्ध्व धरणातुन जायकवाडी प्रकल्पासाठी नाथसागर जलाशयात पाणी सोडण्यात आले.

जायकवाडी प्रकल्पाच्या नाथसागर जलाशयात प्राप्त पाणी फक्त पिण्याच्या प्रयोजनासाठी वापरण्याचे मा.उच्च न्यायालय, मुंबई व मा.सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली यांचे निर्देश आहेत.

त्यामुळे कृषि उपसा सिंचनावर निर्बंध घालण्यात आलेले आहेत
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात पोषणमुल्यांच्या अभावी मुली व महिलांमध्ये ॲनिमियाची व हिमोग्लोबिनची कमतरता असल्याबाबत

**(७४) * ४१८६६ श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **महिला व बाल विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात पोषणमुल्यांच्या कमतरतेमुळे ९० टक्के मुली व महिलांमध्ये ॲनिमियाची व हिमोग्लोबिनची कमतरता असल्याची गंभीर माहिती माहे जानेवारी, २०१६ च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) तसेच राज्यातील महिला व मुलींना उच्च दर्जाच्या आरोग्यसुविधा उपलब्ध करुन देऊन त्यांच्या सक्षमिकरणासाठी लवकरात लवकर निर्णय घेऊन त्यांची अंमलबजावणी करण्यासंदर्भात आतापर्यंत कोणता पाठपुरावा केला वा करण्यात येत आहे
(३) असल्यास, उक्त प्रश्न भाग (१) मधील चौकशी केली आहे काय चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे अशंत: खरे आहे.

एन.एफ.एच.एस-४(२०१५-१६) च्या अहवालानुसार राज्यातील १५ ते ४९ वर्षे वयोगटातील ४८ टक्के महिलांमध्ये रक्तक्षयाचे प्रमाण आढळून आले आहे.
(२) व (३), राज्यातील महिला व मुलींसाठी आरोग्य सुविधा तसेच रक्तक्षयाच्या प्रतिबंधासाठी व उपचारासाठी पुढीलप्रमाणे उपाययोजना / कार्यवाही करण्यात येते :-

- राज्यातील विविध आरोग्य संस्थाव्दारे महिला व मुलींना आरोग्य सेवा देण्यात येतात.
- ० ते १८ वर्षे वयोगटातील मुलींची अंगणवाडी व शाळेत राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रमांतर्गत तपासणी व उपचार केले जातात.
- राज्यात किशोरवयीन १० ते १९ वर्षे वयोगटातील मुलींना ३२९ ॲडोलसेन्ट हेल्थ क्लिनीक मार्फत आरोग्य विषयक सेवा व समुपदेशन केले जाते.
- गरोदर मातांची लवकरात लवकर नोंदणी व नोंदणीसह किमान ५ वेळा प्रसूतीपुर्व तपासणी करण्यात येते.
- प्रत्येक प्रसुतीपूर्व तपासणीच्यावेळी मातेच्या रक्तातील हिमोग्लोबिनची चाचणी करण्यात येते.
- गरोदरपणात व प्रसुतीपश्चात ६ महिने रक्तक्षय प्रतिबंधात्मक व उपचारात्मक लोहयुक्त गोळयांचे वाटप करण्यात येते.
- तसेच गरोदरपणात जंतनाशक गोळयांचे वाटपही करण्यात येते.
- तीव्र रक्तक्षय असणाऱ्या गरोदर मातांना शिरेव्दारे इंजे.आयर्न सुक्रोज दिले जाते.
- तीव्र रक्तक्षय असणाऱ्या गरोदर मातांना गरजेनुसार मोफत रक्त पुरवठाही करण्यात येतो.
- शाळेतील व शालाबाहय सर्व किशोरवयीन मुलींना रक्तक्षय होऊ नये याकरीता दर सोमवारी एक लोहयुक्त गोळी देण्यात येते. जंतविकार / जंतदोषासाठी वर्षातून दोन वेळा जंतनाशक गोळयाही देण्यात येतात.
- गरोदर मातांना ग्राम आरोग्य व पोषण दिनाच्या दिवशी आहार, कुटूंब कल्याण व वैयक्तिक स्वच्छतेबाबत आरोग्य शिक्षण देण्यात येते.
- आरोग्य संस्थामार्फत कुटूंब नियोजनाच्या विविध पध्दती तसेच गर्भपात सेवा उपलब्ध करुन देण्यात येते.
- याव्यतिरिक्त महिलांच्या विविध आजारांसाठी निदान व उपचाराच्या सेवा राज्यातील आरोग्य संस्थामधून उपलब्ध करुन दिल्या जातात.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बुलढाणा शहरासाठीची पाणी पुरवठा योजना अपूर्ण अवस्थेत असल्याबाबत

**(७५) * ४९२१३ श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्हयातील खडकपुर्णा धरणावरुन बुलढाणा शहरासाठी पाणी पुरवठा करणारी पाणी पुरवठा योजना अनेक वर्षापासून प्रलंबित असल्याने शहरातील नागरीकांमध्ये असंतोष पसरला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुसार जलवाहिनीची कामे पुर्ण करुन पाणी पुरवठा करण्याबाबत संबंधीत विभाग व कंत्राटदाराने दुर्लक्ष केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय व चौकशीत काय आढळून आले,

(४) असल्यास,पाणी पुरवठा योजनेचे काम पुर्ण करण्याच्या दृष्टीने दिरंगाई करणा-या संबंधित विभागाच्या अधिका-यांवर व कंत्राटदारावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) तसेच पाणी पुरवठा योजना पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियानांतर्गत बुलढाणा शहरासाठी खडकपूर्णा धरणातुन पाणी पुरवठा करण्याच्या रु.८२.७७ कोटी किंमतीच्या प्रकल्पास सन २०१२ मध्ये मंजूरी प्रदान करण्यात आली आहे.

सदर पाणी पुरवठा योजनेची कामे प्रगतीपथावर आहेत. शहरामध्ये सध्या तीन दिवसआड पाणीपुरवठा करण्यात येत असून त्यामुळे नागरिकांमध्ये असंतोष पसरला नाही.

(२), (३), (४) व (५) सदर प्रकल्पासाठी राज्य शासन हिश्यापैकी प्रथम हप्त्याचा रु.३३.१० कोटी इतका निधी नगरपरिषदेस वितरीत करण्यात आला आहे.

बुलढाणा नगरपरिषदेमार्फत शासनाने वितरीत केलेल्या प्रथम हप्त्याच्या निधीच्या प्रमाणात रु.८.२७ कोटी निधी उभा करणे अपेक्षित आहे.

तथापि बुलढाणा नगरपरिषदेमार्फत त्यांच्या हिश्याचा अपेक्षित निधी उभा केला नसल्यामुळे सदर योजनेसाठी दुसरा हप्त्याच्या निधी मागणीचा प्रस्ताव शासनास अप्राप्त आहे.

त्याअनुषंगाने सदर प्रकल्पासाठी नगरपरिषद स्वहिश्याचा निधी वित्त आयोग, नगरपरिषद निधी व अन्य माध्यमातून उभा करण्याचे निदेश देऊन प्रकल्प लवकर पूर्ण करणेबाबत सूचना नगरपरिषदेस देण्यात आल्या आहेत.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**सांगली जिल्हयातील इंदिरा आवास योजनेस पात्र असणारी कुटुंबे अद्याप बेघर असल्याबाबत**

**(७६) * ४६८६२ श्री.धनजंय (सुधीर) गाडगीळ (सांगली) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सांगली जिल्हयामध्ये इंदिरा आवास योजनेच्या निकषात बसणारी परंतु इतर अनेक कारणांनी ७३३६ कुटुंबे अद्यापही या योजनेपासून वंचित आहेत, हे खरे आहे काय,
(२) तसेच सांगली जिल्हयास इंदिरा आवास योजनेअंतर्गत किती घरांचे उद्दिष्ट दिले होते व किती घरांचे उद्दिष्ट पूर्ण करण्यात आली आहेत,
(३) असल्यास, इंदिरा आवास योजनेपासून वंचित असलेल्या कुटुंबांना घरे देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय,
सांगली जिल्हयात इंदिरा आवास योजनेअंतर्गत पात्र असलेले परंतु घरकुल बांधकामासाठी स्वत; ची जागा नसल्याने ७५६१ कुटुंबे घरकुल योजनेपासून वंचित आहेत.
(२) सांगली जिल्हयास सन २०१५-१६ साठी इंदिरा आवास योजनेअंतर्गत २४४७ घरकुलांचे उद्दिष्ट देण्यात आले आहे.त्यापैकी आज अखेर ११५३ घरकुले पूर्ण करण्यात आली आहे.
(३) इंदिरा आवास योजनेअंतर्गत पात्र असलेल्या परंतु घरकुल बांधकामासाठी स्वत:ची जागा नसल्यामुळे घरकुलाच्या लाभापासून वंचित आहेत, अशा लाभार्थ्यांना स्वत:ची जागा खरेदी करण्यासाठी रु. ५०,०००/- पर्यत अर्थसहाय्य देण्यासाठी शासनाने दि. ३० डिसेंबर, २०१५ च्या शासन निर्णयान्वये "पंडीत दीनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य योजना" सुरु केली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही

-----------------

## रत्नागिरी जिल्हयातील गडनदी मध्यम व लघु पाटबंधारे प्रकल्प अपूर्णावस्थेत असल्याबाबत

**(७७) * ४०८८९ श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.नितेश राणे (कणकवली), श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्हयातील गडनदी (ता.संगमेश्र्वर) जामदा, अर्जुना (ता.राजापूर) हे मध्यम तर तिडे, चिंचवाडी, पन्हाळे, रांगव, ओझर, काळचेवाडी, चव्हाणवाडी, साखरपा, आसगा, कुडूप, पोयनार, शरिसाडी, शेलारवाडी, मांडवे, आवाशी, तळवट, गडगडी असे २१ पाटबंधारे मागील ३० वर्षापासून अपूर्णावस्थेत आहेत, हे खरे आहे काय,

(२) तसेच संगमेश्वर तालुक्यातील देवडे, चिपळूण तालुक्यातील सुतारवाडी, खेड तालुक्यातील किंजळे, राजापूर तालुक्यातील नव्या पाटबंधारे प्रकल्पांना शासनाने मंजूरी दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) सदरहू २१ मध्यम व लघुपाटबंधारे प्रकल्प पूर्ण होण्यासाठी आणखी किती खर्च करावा लागणार आहे व अपूर्णावस्थेत असलेले २१ मध्यम व लघु पाटबंधाऱ्यांची कामे लवकरात लवकर पूर्ण होण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय, अंशत: खरे आहे.

प्रगतीपथावरील प्रकल्पांची संख्या २१ नसून ती २० आहे.

(२) हे खरे नाही.

(३) रत्नागिरी जिल्हयातील प्रश्न क्र.१ येथे नमुद केलेले बांधकामाधीन असलेले ३ मध्यम व १७ लघु पाटबंधारे प्रकल्प पूर्ण करण्यास सुमारे १६६० कोटी निधीची आवश्यकता आहे. प्रकल्पाचे भूसंपादन व पूनर्वसन पूर्ण करुन निधीच्या उपलब्धतेनुसार प्रकल्प पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नांदेड जिल्हयात राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रमांतर्गत कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांना मानधन अदा न केल्याबाबत

**(७८) * ४९७४२ डॉ.तुषार राठोड (मुखेड) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्हयात राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रमांतर्गत नियुक्त करण्यात आलेल्या १७२ कर्मचाऱ्यांचे मानधन न अदा करता योजनेअंतर्गत बीएफओ पथकात कार्यरत ४३ वाहनांची देयके नियमित अदा करण्यात आली असल्याचे माहे नोव्हेंबर-डिसेंबर २०१५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त नमुद ४३ वाहनांचे देयके देण्यासंबंधी ई-टेंडरिंगने निविदा काढण्यात आली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त बाबत चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीअंती कोणती कार्यवाही करण्यात आली आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे नाही.

नांदेड जिल्हयात राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रमांतर्गत ४५ वाहन पथके व ४५ वाहने भाडेतत्वावर कार्यरत असून एकूण १७८ मंजुर पदांपैकी १६५ वैद्यकिय अधिकारी व कर्मचारी कार्यरत आहेत. सदर कर्मचाऱ्यांस एप्रिल ते डिसेंबर २०१५ पर्यन्तचे मानधन व एप्रिल ते डिसेंबर २०१५ पर्यंतची वाहनाची देयके मे २०१५ ते फेब्रुवारी २०१६ या कालावधीत अदा करण्यात आलेली आहेत.

(२) हे खरे नाही.

सदर वाहने मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांच्या मार्फत ई-निविदा द्वारे भाडे तत्वावर उपलब्ध करुन देण्यात आली आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अमरावती जिल्हयातील सामान्य रुग्णालयास (इर्वीन) सिटी स्कॅन व डिजिटल एक्स-रे मशीन उपलब्ध करुन देण्याबाबत

**(७९) * ४८१४४ ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्हयातील जिल्हा सामान्य रुग्णालय (इर्वीन) येथे सिटी स्कॅन, डिजिटल एक्स-रे मशीन उपलब्ध नसल्याने गोरगरीब रुग्णांना नाहक त्रास सहन करावा लागत असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अमरावती जिल्हा सामान्य रुग्णालयात सीटी स्कॅन, एक्स-रे मशीन उपलब्ध करुन देण्याबाबत अनेक वेळा मागणी करुन शासनाकडून दुर्लक्ष केले जाते, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रश्नाबाबत चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले शासनस्तरावरुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप, उक्त प्रश्नाबाबत कोणतीच कार्यवाही होत नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) अंशत: खरे आहे.

जिल्हा सामान्य रुग्णालय, अमरावती येथे दोन क्ष-किरण मशीन कार्यरत आहेत.

सदरहू रुग्णालयातील सी.टी. स्कॅन मशीन बंद असले तरी रुग्णांची गैरसोय टाळण्यासाठी गरजू व बी.पी.एल. धारक रुग्णांचे मोफत सी.टी. स्कॅन करण्याची व्यवस्था करण्यात आलेली आहे.

(२) जिल्हा रुग्णालय, अमरावती करीता नविन सिटी स्कॅन मशीन उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने आरोग्य सेवा संचालनालयामार्फत निविदा प्रक्रिया करण्यात येऊन दिनांक १४.०२.२०१६ रोजी सिटी स्कॅन मशीन खरेदीबाबतचे पुरवठा आदेश निर्गमित करण्यात आले आहेत.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## एकात्मिक राज्य जल आराखडा अस्तित्वात नसतानाही मंजूरी देण्यात आलेल्या सिंचन प्रकल्पात अनियमितता असल्याबाबत

**(८०) * ४४२४८ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.संजय शिरसाट (औरंगाबाद पश्चिम), श्रीमती संगीता ठोंबरे (केज), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.नितेश राणे (कणकवली), श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) एकात्मिक राज्य जल आराखडा अस्तित्वात नसतांनाही सन २००७ ते २०१३ या काळात मंजूरी देण्यात आलेल्या ५ हजार ६०० कोटी रुपयांच्या १८९ सिंचन प्रकल्पात अनियमितता असल्याचे आढळून आल्याने, त्याची चौकशी करण्याचे आदेश मा.उच्च न्यायालयाने दिनांक २४ डिसेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास शासनास दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच १८९ सिंचन प्रकल्पाची चौकशी करण्यासाठी शासनाने चार सदस्यीय समिती नियुक्ती केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर समिती मराठवाड्यातील १०, विदर्भातील ३८ अशा एकूण ४८ सिंचन प्रकल्पांची चौकशी करणार असल्याचे दिनांक ११ फेब्रुवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार सदरहू १८९ प्रकल्पांची शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीअंती काय आढळून आले,

(५) असल्यास, त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय, मा. मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांनी दिनांक १८/१२/२०१५ रोजी दिलेल्या अंतरिम निकालानुसार खालील निर्देश दिले आहेत.

१. किकवी लघु प्रकल्प व कांचनपूर बृहत लपा प्रकल्पांचे निविदा निश्चितीमध्ये अनियमितता आली आहे किंवा कसे ? याची चौकशी करणे.
२. प्रकल्पाचे बांधकाम सुरु होण्याची खात्री न करता कंत्राटदारास अग्रीम रक्कम अदा केली असल्यास त्याची चौकशी करणे.

३. प्रत्यक्ष बांधकाम सुरु न झालेल्या ६६ प्रकल्प आर्थिक, जल वैज्ञानिक व पर्यावरणाचे निकष पूर्ण करतात किंवा कसे ? याचे पुन:विलोकन करणे.

(२) होय, या बाबतचा शासन निर्णय दि.१०/०२/२०१६ रोजी निर्गमित केला आहे.

(३) अंशत: खरे आहे. समिती मराठवाड्यातील १३ विदर्भातील ४९, उत्तर महाराष्ट्र प्रदेशातील २, कोकणातील १ व पश्चिम महाराष्ट्रातील १ अशा ६६ प्रकल्पाची उपरोक्त उपप्रश्न १ च्या उत्तरात नमुद केलेनुसार चौकशी / पुन:विलोकन करणार आहे.

(४) व (५) दिनांक १० फेब्रुवारी, २०१६ रोजी शासनाने नियुक्त केलेल्या समितीस ३ महिन्याचा कालावधी दिलेला आहे. अहवाल अद्यापी प्राप्त झालेला नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**एड्सचा संसर्गामुळे मृत्युमुखी पडणाऱ्या बालकांची संख्या वाढत असल्याबाबत**

**(८१) * ४७७८१ श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) एचआयव्ही आणि एड्सचा संसर्ग रोखण्यासाठी शासकीय यंत्रणा अपुरी पडत असल्यामुळे मुंबईत दर महिन्याला ५ बालकांचा मृत्यु होत असल्याची बाब माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गर्भवती महिलेपासून बाळाला एचआयव्हीची लागण झाल्यास करावयाचे औषधोपचार व याबाबतची जनजागृती यामध्ये त्रुटी असल्यामुळे, तसेच अत्याधुनिक औषधोपचाराचा अभाव यामुळे मृत्युमुखी पडणाऱ्या बालकांची संख्या वाढत आहे, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, सदरील मृत्यु रोखण्यासाठी शासनाने कोणती उपयायोजना केलेली आहे अथवा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राजीव गांधी जीवनदायी योजनेंतर्गत आदिवासी बहुल जिल्ह्यात बनावट शस्त्रक्रिया दर्शविण्यात येत असल्याबाबत**

**(८२) * ५०३१५ श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने गरीब कुटूंबातील दुर्धर आजाराने ग्रस्त रुग्णांना उपचार करता यावा या उद्देशाने सुरू केलेल्या राजीव गांधी जीवनदायी योजनेत आदिवासी बहुल जिल्ह्यात गैरप्रकार होत असल्याचे माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाच्या आरोग्य यंत्रणेतील कर्मचारी व डॉक्टर संगनमत करुन सेवेच्या नावावर फक्त पैसे शासनाकडून घेत आहेत तसेच अंगीकृत रुग्णालयांतील डॉक्टर बनावट रुग्णांवर शस्त्रक्रिया दाखवून पैसे घेत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन संबंधित रुग्णालयातील डॉक्टर व शासनाचे अधिकारी यांच्यावर कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दिपक सावंत :** (१) होय. योजनेंतर्गत दि.३१.१२.२०१५ पर्यंत आदिवासी बहुल जिल्हयांमध्ये एकुण १६८४ तक्रारी प्राप्त झाल्या असुन त्यापैकी १४४९ तक्रारींचे निवारण करण्यात आले असून उर्वरित तक्रारींचे निवारण करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

(२) नाही, अशा प्रकारची बाब निदर्शनास आली नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मौजे सिंदपूरी (ता.तुमसर, जि.भंडारा) येथील तलावाची फुटलेली पाळ दुरुस्तीकरीता निधी मिळण्याबाबत**

**(८३) * ४७५७२ श्री.चरण वाघमारे (तुमसर), श्री.रामचंद्र अवसरे (भंडारा), श्री.संजय पुराम (आमगाव) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे सिंदपूरी (ता.तुमसर, जि.भंडारा) येथील तलाव फुटल्याने गावातील अनेक घरे बाधीत होऊन रस्त्यावर कुटुंब राहत असल्याने त्यांना घरकुल देण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधीकडून करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच, तलावाची फुटलेली पाळ दुरुस्तीकरीता शासनाने निधी मंजूर करावा यासाठी स्थानिक लोकांकडून मागणी करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने उक्त मागणीवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) व (२) होय.
(३) व (४) उक्त मागणीवर जिल्हा परिषदेने नादुरुस्त तलावाचे दुरुस्तीचे अंदाजपत्रक रु.२४८.०० लक्षचे तयार करुन मंजूरीस्तव शासनास सादर केले होते. सदर प्रस्तावास विदर्भ सधन सिंचन विकास कार्यक्रमात निधी उपलब्ध नसल्यामुळे मुख्य अभियंता, विदर्भ सधन सिंचन विकास कार्यक्रम, नागपूर यांना राज्य निधी तरतूदीसाठी प्रचलित नियमानुसार कार्यवाही करण्याबाबत निर्देश देण्यात आले आहेत. तसेच सदर माजी मालगुजारी तलाव १०० हेक्टरवरील सिंचन असल्यामुळे दिनांक ०२.०१.२०१६ रोजी झालेल्या आढावा सभेत विभागीय आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर यांनी सदर कामाची दुरुस्ती जलसंपदा विभागाकडे सुपूर्द केली आहे.

-----------------

**परळी (ता.वाडा, जि.पालघर) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रास ग्रामीण रुग्णालयाचा दर्जा देऊन सोयीसुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(८४) * ४८०४० श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परळी (ता.वाडा, जि.पालघर) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रास ग्रामीण रुग्णालयाचा दर्जा देऊन सोयीसुविधा उपलब्ध करुन देण्याबाबतची मागणी स्थानिक आदिवासी ग्रामस्थ, मा. लोकप्रतिनिधी, भिवंडी पूर्व यांनी मा.सार्वजनिक आरोग्य मंत्री यांच्याकडे माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मौजे परळी (ता.वाडा) या आदिवासी भागातील आरोग्य केंद्रात कर्मचारी संख्या अपुरी असणे, पुरेसा औषधसाठा उपलब्ध नसणे, कर्मचाऱ्यांसाठी मुख्यालयात राहण्याची व्यवस्था नसणे व इतर असुविधेबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी पालघर, जिल्हा आरोग्य अधिकारी-पालघर व गटविकास अधिकारी यांच्याकडे तक्रारी करुनही ते दुर्लक्ष करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त दोन्ही प्रकरणांची चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही. परळी, जि.पालघर येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात कर्मचाऱ्यांची एकूण १५ पदे मंजूर असून त्यापैकी १२ पदे भरलेली आहेत. त्यामुळे कर्मचारी संख्या अपुरी नाही. तसेच तेथे येणाऱ्या रुग्णांस प्राथमिक आरोग्य केंद्राच्या निकषानुसार उपलब्ध आरोग्य विषयक सेवा-सुविधा पुरविण्यात येतात. औषधसाठाही पुरेशा प्रमाणात उपलब्ध आहे. सदर आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकाऱ्यांसाठी-२, औषधनिर्माण अधिकाऱ्यांसाठी-१, आरोग्य सहाय्यकांसाठी-२, आरोग्य सेविकेसाठी-१ व वाहनचालकासाठी-१ याप्रमाणे एकूण ७ निवासस्थानांची व्यवस्था केलेली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**जळगांव शहरातील आंबेडकर मार्केटमध्ये असलेल्या**
**बचत गटांची झालेली फसवणूक**

**(८५) * ३९७८७ श्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण), श्री.चंद्रकांत सोनावणे (चोपडा) :** सन्माननीय **महिला व बाल विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगांव शहरातील आंबेडकर मार्केटमध्ये असलेल्या बहिणाबाई सातपुडा आदिवासी शैक्षणिक व क्रिडा संस्थेने कर्जाचे आमिष दाखवून बचत गटांच्या महिलांकडून प्रत्येकी १५०० ते २५०० रुपये घेतल्याचे नुकतेच माहे जानेवारी,२०१६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त रक्कमांच्या बदल्यात ३० हजार व ५० हजार रुपये कर्ज देण्याचे आश्वासन देवून आज दोन महिन्याचा कालावधी नंतरही अद्याप कर्ज न दिल्याने महिलांनी फसवणूक झाल्याप्रकरणी जिल्हा पेठ पोलिस स्टेशनमध्ये तक्रार नोंदविली आहे, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, याबाबत शासनाने सखोल चौकशी केली आहे काय चौकशी काय आढळून आले

(४) तद्नुसार उक्त दोषी संस्थेवर कोणती कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) व (२) सदर प्रकरणी दि.२०.१.२०१६ रोजी अर्जदार सरला मनोज पाटील रा.जळगाव हीचा तक्रार अर्ज पोलीस अधिक्षक, जळगाव यांना प्राप्त झाला असून सदर अर्जाची चौकशी पो.नि. जिल्हा पेठ यांचे मार्फत करण्यात येत असून सदर तक्रार अर्जात अजर्दार यांनी मोहम्मद सलीम अब्दुल पिंजारी रा.साकळी, ता.यावल यांचे विरुध्द तक्रार अर्ज दिला आहे. अर्ज चौकशी मध्ये गैरअर्जदार यांनी मी बहिणाबाई सातपुडा आदिवासी शैक्षणिक व क्रिडा बहुउद्देशीय संस्था साकळी ता.यावत संस्थेचा चेअरमन असून जळगाव आंबेडकर मार्केट येथे संस्थेचे कार्यालय आहे. सदरच्या संस्थेचा नोंदणी क्र. एफ/१२७१४ जळगाव दि.८.११.२०११ अन्वये प्रमाणीत असून शासनाच्या योजना बचत महिला गटापर्यंत पोहचविण्याचे काम करतो. शासनाकडून विविध उद्योगासाठी मिळणारे कर्जाची माहिती बचत गटांना देतो. त्यासाठी पैसे घेवून बचत गटाच्या नावे बँकेत जमा करतो, विविध बचत गटांचे एकूण तीन लाख दहा हजार रुपये जमा झालेले होते. परंतु बचत गटाचे महिलांचे आपसात वाद झाल्याने मी सदर रकमपैकी दोन लाख ऐंशी हजार रुपये बचत गटांच्या महिला सभासदांना परत केले आहे उर्वरित रक्कम लवकरच परत करीत आहे बाबत चौकशी सांगितले. अर्जदार हीने पैसे परत मिळाल्याने तक्रार नसल्याचे लिहून दिले आहे. असे पोलीस अधिक्षक, जळगाव यांच्या अहवालामध्ये आहे.

सदर प्रकाराबाबत पोलीस अधिक्षक, जळगाव यांना वरिष्ठ व स्थानिक स्तरावर अर्ज प्राप्त झाले असून बचत गटांच्या कोणीही महिला फसवणूकीची तक्रार देण्यासाठी पुढे आल्या नाहीत. बचत गटांतील महिलांचे पैसे परत मिळवून देण्याच्या दृष्टीने पोलीस अधिक्षक जळगाव यांच्याकडून सदर तक्रार अर्जाची चौकशी सुरु आहे.

(३) व (४) याबाबत पोलीस अधिक्षक, जळगाव यांच्यामार्फत चौकशी सुरु असून चौकशीत गुन्हयाचा प्रकार निष्पन्न झाल्यास व तक्रारदार तक्रार करण्यास तयार असल्यास कायदेशीर कार्यवाही करण्याची दक्षता पोलीस अधिक्षक, जळगाव यांनी ठेवली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मौजे नानिवड वाडेकरवाडी (ता.वैभववाडी, जि.सिंधुदुर्ग) येथील धरण बैठक सांडवा पुच्छकालवा बांधकामामध्ये झालेला गैरव्यवहार**

**(८६) * ४४५९२ श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे नानिवड वाडेकरवाडी (ता.वैभववाडी, जि.सिंधुदुर्ग) येथील धरण बैठक सांडवा पुच्छकालवा बांधकामामध्ये मोठया प्रमाणात गैरव्यवहार झाल्याचे नुकतेच माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर धरण बैठक सांडवा पुच्छकालवाकरीता अंदाजे १४ कोटी रुपयांचा खर्च शासनाने केला असून गावामध्ये मोठे धरण असल्यामुळे सदर धरण बैठक सांडवा पुच्छकालवाची आवश्यकता नसतांनाही वापर असलेल्या जमिनीवर अतिक्रमण करुन सदर प्रस्ताव मंजूर करण्यात आलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात ग्रामस्थांनी मा.मंत्री, राज्यमंत्री, ग्रामविकास, पालकमंत्री यांना माहे जानेवारी, २०१६ मध्ये पत्रव्यहार करुन सदर बाब निदर्शनास आणूनही अद्यापी कोणतीच कार्यवाही झालेली नाही, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(५) असल्यास, तद्नुसार शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही.

(२) सदर धरणास रुपये ९९३.८० लक्ष इतक्या रक्कमेस मान्यता प्राप्त असून फक्त धरणाचे काम प्रगतीपथावर आहे. या योजनेवर जानेवारी, २०१६ पर्यंत रूपये १०७.५९ लक्ष निधी खर्च झालेला आहे.सदर धरणाचे फक्त भरावाचे मातीकाम झाले असून सांडवा, शिर्ष विमोचक अथवा पुच्छ कालव्याचे काम अद्याप सुरु नाही.

यापुर्वी या गावात महाजनवाडी येथील धरण पूर्ण आहे. तथापि, या धरणाचे बांधकाम वेगळ्या नाल्यावर असून वाडेकरवाडी येथील धरण हे महाजनवाडी येथील धरणापेक्षा उंचावर असल्यामुळे दोन्हींचे लाभक्षेत्र वेगवेगळे आहे.

नानिवडे (वाडेकरवाडी) या योजनेबाबत ग्रामस्थांची आग्रही मागणी होती. तसेच तत्कालीन पंचायत समिती सदस्य यांनी, “सदरचा प्रकल्प झाल्यास नानिवडे गावातील पाणीटंचाई व शेतीसाठीचा पाण्याचा प्रश्न सुटून येथील लोकांचे जनजीवन व आर्थिक स्तर उंचावण्यास मदत होईल. हा प्रकल्प सुरु होण्यासाठी जमीन मालक उत्सुक आहेत. सदरच्या प्रकल्पामुळे कोणत्याही पुनर्वसनाचा प्रश्न उद्भवणार नाही आणि हा प्रकल्प व्हावा अशी ग्रामस्थांची मागणी आहे. सदरचा प्रकल्पास सुरुवात होण्याच्या दृष्टीने कार्यवाही व्हावी” अशी मागणी दिनांक २८/१०/२०१० अन्वये केली आहे.

(३) अशा प्रकारचे निवेदन अधीक्षक अभियंता, लघु सिंचन (जलसंधारण) मंडळ, ठाणे यांचे कार्यालयात आढळून येत नाही.

(४), (५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्य जलसंपत्ती नियामक प्राधिकरणाने पाण्याच्या वाटपाचे विस्तृत धोरण आखण्याबाबत

**(८७) * ४२२८२ श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील पाण्याची उपलब्धता, ऊसाला लागणारे जादा पाणी आदी सर्व बाबींचा विचार करुन शासनाने व राज्य जलसंपत्ती नियामक प्राधिकरणाने पाण्याच्या वाटपाचे विस्तृत धोरण आखावे अशी सूचना मा.उच्च न्यायालयाने माहे डिसेंबर, २०१५ च्या तिसऱ्या आठवड्यात एका जनहित याचिकेवरील सुनावणीच्यावेळी केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मा.उच्च न्यायालयाने यासंदर्भात केलेल्या सूचनांचे सविस्तर स्वरुप काय आहे,

(३) असल्यास, तद्नुसार कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) नाही

पाणी वाटपाचे विस्तृत धोरण आखण्याची सूचना मा.उच्च न्यायालयाने माहे डिसेंबर-२०१५ वा त्या दरम्यान केलेली नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कळवण (जि.नाशिक) तालुक्यातील ओतूर लघु पाटबंधारे प्रकल्पाचे काम अपूर्णावस्थेत असल्याबाबत

**(८८) * ५०२३८ श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) १०० टक्के आदिवासी क्षेत्र असलेल्या कळवण (जि.नाशिक) तालुक्यातील ओतूर लघु पाटबंधारे प्रकल्पाला गळती प्रतिबंधक दुरुस्ती व सुधारणा कामास शासनाने ७ कोटी १२ लाखाची प्रशासकीय मान्यता सन २०१३-२०१४ मध्ये दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गेल्या दोन वर्षापूर्वी कामाची निविदा काढून कामासाठी ठेकेदार निश्चित करुन देखील गेल्या दोन वर्षापासून धरणाचे काम बंद आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीत काय आढळून आले,

(४) असल्यास, त्यानुसार संबंधित ठेकेदारावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) अंशत: खरे आहे.

शासनाने दिनांक २८/१२/२०११ च्या शासन निर्णयान्वये ओतुर लघु पाटबंधारे प्रकल्पाला गळती प्रतीबंधक दुरुस्ती व सुधारणा कामास रु.७१२.४४ लक्ष किंमतीच्या अंदाजपत्रकास प्रशासकिय मान्यता दिलेली आहे.

(२) अंशत: खरे आहे.

कामाची निविदा मंजूर असून आदेश दिनांक १७.०६.२०१४ रोजी दिले आहेत. काम चालू असतांना तांत्रिक चाचणी घेण्यात आलेल्या अडचणीमूळे दिनांक १५.०५.२०१५ पासून काम बंद आहे.

(३) क्षेत्रिय मुख्य अभियतांनी कामांची पाहणी करुन काम पून्हा सूरु करण्याबाबत चे नियोजन केले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**वाशिम जिल्ह्यात निर्माण झालेल्या पाणीटंचाईवर करावयाच्या उपाययोजना**

**(८९) * ४९८३२ श्री.अमित झनक (रिसोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाशिम जिल्ह्यात सलग तिसऱ्यावर्षी दुष्काळाची दाहकता कायम असून यंदा पावसात घट झाल्यामुळे दिनांक २३ डिसेंबर, २०१५ अखेर जिल्ह्यातील १०७ पैकी २३ लघूप्रकल्प कोरडे पडल्याने रब्बी हंगामातील पिकांच्या सिंचनासोबतच पिण्याच्या पाण्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला असल्याचे माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, येथील पाणीटंचाई लक्षात घेता पाण्याच्या बचतीसंदर्भात ठोस नियोजन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) अशंत: खरे आहे. वाशीम जिल्हयातील ११० प्रकल्पापैकी ५ प्रकल्प कोरडे झालेले असून २० लघु प्रकल्पात फक्त मृतसाठा शिल्लक आहे. दिनांक २३ डिसेंबर, २०१५ अखेर वाशिम जिल्हयातील एकूण प्रकल्पात सरासरी ३०.९८% जलसाठा शिल्लक होता.

(२) उपलब्ध पाण्याचा वापर प्राधान्याने पिण्यासाठी करण्याच्या दृष्टीने धरणातील पाण्याचे नियोजन करण्याचे अधिकार महसूल विभागास दिलेले आहेत. त्यानुसार जिल्हाधिकारी, वाशिम यांनी कार्यवाही केलेली आहे.

पाणी टंचाई लक्षात घेता पिण्याचे आरक्षण असलेल्या प्रकल्पावरील अवैध उपसा रोखण्यासाठी विद्युत पुरवठा खंडीत करण्यात येत आहे.

शेतकऱ्यांना व जनतेस पाणी बचतीबाबत मार्गदर्शन करण्याकरिता "जलजागृती अभियान राबविण्याचे नियोजन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## रत्नागिरी जिल्हयातील धनगरवाड्या अद्यापही रस्ते व पाणी यासारख्या मुलभूत सुविधांपासून वंचित असल्याबाबत

**(९०) * ५१४५१ श्री.संजय कदम (दापोली), श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्हयातील मंडणगड, दापोली, खेड, गुहागर, चिपळून, संगमेश्वर, लांजा व राजापूर या तालुक्यातील धनगरवाड्या अंदाजे २२५ असून त्या डोंगरामध्ये वसलेल्या असून अद्यापही रस्ते व पाणी यासारख्या मुलभूत सुविधांपासून वंचित आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या भागात नळपाणी योजना राबविल्यास उन्हाळ्यातील पाणी टंचाईचा प्रश्न कायमचा सुटू शकतो, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या धनगरवाड्या रस्त्याने जोडण्याबाबत व नळपाणी योजना राबविण्याबाबतचे निवेदन मा.मुख्यमंत्र्यांकडे महाराष्ट्र कोकण धनगर विकास मंडळ, मुंबई यांनी दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) अंशतः खरे आहे. रत्नागिरी जिल्ह्यात २३० धनगरवाड्या असून त्यापैकी १३५ धनगरवाड्यांना रस्त्याची सुविधा नाही तसेच २९ धनगरवाड्यांमध्ये पाणी टंचाई जाणवली होती.

(२) होय, हे खरे आहे. तथापि, काही धनगरवाड्या अति उंच डोंगरावर विखुरलेल्या स्वरुपात वसलेल्या असून पाण्याचे स्रोत डोंगराच्या पायथ्याशी असल्याने योजना आर्थिक निकषात बसत नाही व ग्रामस्थांना देखभाल दुरुस्तीचा खर्चही परवडणार नाही.

(३) होय, हे खरे आहे.

(४) व (५) सदर निवेदनासंबंधी मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद रत्नागिरी यांच्याकडून अहवाल मागविण्यात आला असता जिल्ह्यातील २३० धनगरवाड्यांपैकी पाणी टंचाई भासलेल्या २९ धनगरवाड्यांपैकी ११ धनगरवाड्यांमध्ये पाणीपुरवठा योजना प्रगतीपथावर आहेत. तथापि, १८ धनगरवाड्या अति उंच डोंगरावर विखुरलेल्या स्वरुपात वसलेल्या असून पाण्याचे स्रोत डोंगराच्या पायथ्याशी असल्याने योजना आर्थिक निकषात बसत नाही व ग्रामस्थांना देखभाल दुरुस्तीचा खर्चही परवडणार नाही. त्यामुळे या धनगरवाड्यांसाठी टंचाई कालावधीत वापरण्यासाठी पाऊस पाणी संकलन योजना प्रस्तावित करण्यात आलेली आहे.

तसेच, सदर धनगरवाड्या रस्त्याने जोडण्याची कामे निधीच्या उपलब्धतेनुसार टप्याटप्याने घेण्याचे प्रस्तावित आहे.

-----------------

## दाजीपूर अभयारण्य (जि.कोल्हापूर) येथील भंडणे या परिसरात भेकर या जंगली प्राण्याची झालेले शिकार

**(९१) * ४६७२६ श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दाजीपूर अभयारण्य (जि.कोल्हापूर) येथील भंडणे या संवेदनशील परिसरात भेकर या जंगली प्राण्याची शिकार झाल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भेकर शिकारी प्रकरणी ९ जणांना अटक करुन दोन वन कर्मचाऱ्यांना निलंबित करण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय
(४) असल्यास, चौकशीनुसार दोषी ९ जणांपैकी जिल्हाधिकारी कार्यालयातील अव्वल कारकून फर्नाडिस व पाटबंधारे विभागातील कैलास डिसोझा या दोषींचे निलंबन करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) हे खरे नाही.
(२) दाजीपूर अभयारण्य (जि. कोल्हापूर) येथे विना परवाना बंदूक व काडतुसांसह अभयारण्य क्षेत्रात अपप्रवेश करुन, विस्तव निर्माण केल्या प्रकरणी १० जणांना अटक करण्यात आली होती.

तसेच सदर प्रकरणी २ वन कर्मचाऱ्यांनाही निलंबित करण्यात आले आहे.
(३) प्रस्तूत प्रकरणी विभागीय वन अधिकारी यांच्यामार्फत चौकशी करण्यात आली आहे.
(४) जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांचे कार्यलयातील अव्वल कारकून श्री. मनवेल दावीद फर्नाडीस यांना दिनांक ०४.०१.२०१६ पासून शासन सेवेतून निलंबित करण्यात आले आहे. तसेच कार्यकारी अभियंता, दुधगंगा कालवे विभाग क्र. १ कोल्हापूर यांच्यामार्फत श्री.कैतान अगस्तिन डिसोझा यांच्या गैरवर्तनाबाबत त्यांच्याविरुध्द खात्यांतर्गत चौकशी करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेत समाविष्ट होण्यासाठी अर्ज केलेल्या रुग्णालयांच्या प्रस्तावाबाबत

**(९२) * ४८२१० श्री.छगन भुजबळ (येवला) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेसाठी विमा कंपनी व आरोग्य सोसायटी यांच्यात झालेल्या करारनुसार फक्त ४८० रुग्णालयांची कमाल मर्यादा ठरविल्यामुळे अनेक खाजगी रुग्णालयांनी या योजनेत समाविष्ट होण्यासाठी केलेले अर्ज प्रतिक्षेत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर योजनेसाठी ३० खाटांच्या पुढील सर्व रुग्णालयांचा समावेश करण्याची मा. लोकप्रतिनिधिंनी मागणी केलेली आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, विमा कंपनी सोबतची कमाल मर्यादेची अट रद्द करुन या योजनेत समाविष्ट होण्यासाठी अर्ज केलेल्या रुग्णालयांचे प्रस्ताव मंजुरीसाठी शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) अद्याप कोणतीही कार्यवाही केलेली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) होय. विमा कंपनीशी झालेल्या करारानुसार योजनेतंर्गत कमाल ४७० रुग्णालये अंगीकृत करण्याची तरतुद आहे. तथपि विमा कंपनीच्या सहमतीने पहिल्या टप्प्याकरिता ६ व मा.मुख्यमंत्री यांनी घोषणा केल्यानुसार १४ शेतकरी आत्महत्याग्रस्त जिल्हयांमये १५ अशा एकुण २१ अतिरिक्त रुग्णालयांसह योजनेंतर्गत ४९१ रुग्णालये अंगीकृत करण्यात आली आहेत.
(२) होय.
(३) नॅशनल इन्शुरन्स कंपनी व राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना सोसायटी यांच्यामध्ये झालेल्या करारात मान्य केल्यापेक्षा जास्त रुग्णालये अंगीकृत करण्यात आलेली आहेत. सदर करार संपुष्टात आल्याशिवाय यामध्ये बदल करता येणार नाही. सदर करार दि.२० नोव्हेंबर, २०१६ रोजी संपुष्टात येत असुन त्यानंतर नव्याने करण्यात येणाऱ्या करारामध्ये योजनंतर्गत अंगीकृत रुग्णालयांची कमाल मर्यादा वाढविणे/कमाल मर्यादेची अट रद्द करणे प्रस्तावित आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## चंद्रपूर जिल्हयातील ब्रम्हपूरी येथे वनउद्यानाचे बांधकाम करण्याबाबत

**(९३) * ३९७९९ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंद्रपूर जिल्हयातील ब्रम्हपूरी येथे वन विभागाच्या नर्सरीमध्ये वन विभागाच्या वतीने वनउद्यानाचे बांधकाम करण्यासाठी उपसंरक्षक वनविभाग ब्रम्हपूरी यांनी २५६.६८ लक्ष रूपये किमंतीचा अंदाजपत्रक असलेला प्रस्ताव मुख्य वनसंरक्षक वनविभाग चंद्रपूर यांच्या मार्फतीने शासनाकडे पाठविण्यात आल्यामूळे सदर प्रस्तावास मंजूरी देवून निधी उपलब्ध करून देण्याबाबत लोकप्रतिनिधींनी मा. वन मंत्री, प्रधान सचिव, वने यांना दिनांक १२ जानेवारी २०१६ आणि दिनांक ७ ऑक्टोंबर २०१५ रोजी लेखी निवेदन दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वन विभागाच्या वतीने ब्रम्हपूरी येथे वनउद्यान मंजूर करण्यात आले आहे काय वा करण्यात येणार आहे,
(३) असल्यास, वन विभागाच्या वतीने वनउद्यानाचे बांधकाम करण्यासाठी निधीची तरतुद करण्यात आलेली आहे काय वा करण्यात येणार आहे,
(४) अद्यापही कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) चंद्रपूर जिल्हयातील ब्रम्हपूरी येथे वन विभागाच्या नर्सरीमध्ये वन विभागाच्या वतीने वनउद्यानाचे बांधकाम करण्यासंदर्भात लोकप्रतिनिधी यांची मंत्री (वने) व सचिव (वने) यांना दिनांक ५ मे २०१५, दिनांक ३ जून २०१५ आणि दिनांक ७ ऑक्टोंबर २०१५ रोजी लेखी निवेदने प्राप्त झाली आहेत.
(२) ब्रम्हपूरी येथे वनउद्यान मंजूर करण्यात आले आहे.
(३) सदरहू वनउद्यानाचे बांधकाम खनिज विकास निधीच्या माध्यमातून करण्यासाठी रू.२४८.२० लक्ष च्या प्रस्तावास शासनाने दिनांक १५.०३.२०१६ च्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता प्रदान केली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पूर्व विदर्भातील गोदावरी खोऱ्यातील अतिरिक्त पाणी नदी जोड प्रकल्पाचे माध्यमातून पश्चिम विदर्भात वळविण्याबाबत

**(९४) * ४८६०८ श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) : तारांकित प्रश्न क्रमांक १८३२६ ला दिनांक १७ जुलै, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पश्चिम विदर्भात राज्यात सरासरीपेक्षा कमी पाणी असल्याने तापी खोऱ्यातील अतिरिक्त पाणी मागणीचा प्रस्ताव तयार करण्यासाठी मा.राज्यपालांनी २००९ मध्ये निर्देश दिले होते, हे खरे आहे काय,
(२) पूर्व विदर्भातील गोदावरी खोऱ्यातील अतिरिक्त पाणी वैनगंगा-नळगंगा नदी जोड प्रकल्पाच्या माध्यमातून पश्चिम विदर्भात (अमरावती महसूल विभाग) वळविण्यासाठी मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, नागपूर यांनी शासनास प्रस्ताव पाठविला असून अद्याप त्यावर शासनाने कोणताही निर्णय घेतला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रस्तावास तातडीने मान्यता देऊन अमरावती विभागातील सिंचन अनुशेष दूर करण्यासाठी व पश्चिम विदर्भातील पाटबंधारे प्रकल्पांना मंजुरी देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) अंशत: खरे आहे. तापी खोऱ्यातील अमरावती विभागास पुरेसे पाणी उपलब्ध करुन देणे बाबत आवश्यक उपाय योजना करणे गरजेचे आहे असे मा. राज्यपाल महोदयांच्या सन २००९ चे निर्देशात नमुद आहे.
(२) नाही. वैनगंगा - नळगंगा नदी जोड योजनेचा सविस्तर प्रकल्प अहवाल राष्ट्रीय जलविकास अभिकरणामार्फत तयार करण्याबाबत शासनाने दि. ०६/०४/२०१५ च्या पत्रान्वये राष्ट्रीय जल विकास अभिकरणास विनंती केली आहे. सदर योजनेचा सविस्तर प्रकल्प अहवाल राष्ट्रीय जलविकास अभिकरणाकडून मार्च २०१७ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे.
(३) प्रकल्प अहवाल तयार झाले नंतर पुढील कार्यवाही करणेत येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नेवासा (जि.अहमदनगर) तालुक्यातील शासकीय आरोग्य केंद्रामध्ये कर्मचाऱ्यांचा व सोयी-सुविधांचा अभाव असल्याबाबत

**(९५) * ४९१०९ श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नेवासे (जि.अहमदनगर) तालुक्यातील शासकीय आरोग्य केंद्रामध्ये कर्मचाऱ्यांचा तसेच सोयी-सुविधांचा अभाव असल्याचे नुकतेच माहे जानेवारी, २०१६ मध्ये निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त तालुक्यात ९ आरोग्य केंद्र व २ ग्रामीण रुग्णालये असून यासाठी २११ पदे मंजूर असताना ४० कर्मचाऱ्यांच्या जागा रिक्त असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त रुग्णालयात कर्मचाऱ्यांचा अभाव, तसेच सोयी-सुविधा उपलब्ध नसल्याने सर्वसामान्य रुग्णांकडे दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार पदे तात्काळ भरण्याबाबत तसेच सोयी-सुविधा उपलब्ध करण्याबाबत शासन स्तरावर काय कार्यवाही करण्यात आली वा येत आहे

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे नाही, प्राथमिक आरोग्य केंद्रात उपचारासाठी आलेल्या रुग्णांवर वैदयकीय अधिकाऱ्यांमार्फत उपचार करण्यात येतात.

(२) नेवासे तालुक्यात ९ प्राथमिक आरोग्य केंद्रे व ४१ उपकेंद्रात मिळून एकूण १५८ मंजूर पदांपैकी १९ पदे रिक्त आहेत.

(३) हे खरे नाही, प्राथमिक आरोग्य केंद्रे/ उपकेंद्रामार्फत सर्वसामान्य जनतेला निकषानुसार आरोग्य सुविधा पुरविण्यात येत आहेत.

(४) जिल्हा परिषदेमार्फत नोव्हेंबर, २०१५ मध्ये भरती प्रक्रिया राबविण्यात आली असून पदस्थापना देण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## शहापूर (जि.ठाणे) तालुक्याला इगतपूरी (जि.नाशिक) तालुक्यातील भावली धरणातील पाणी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(९६) * ४१८७० श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील शहापूर तालुक्याला इगतपूरी (जि.नाशिक) तालूक्यातील भावली धरणातील पाणी लवकरात लवकर उपलब्ध करुन न दिल्यास मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या भातसा धरणाचे पाणी तोडण्याचा इशारा निवेदनादवारे येथील लोकप्रतिनिधींनी मा. मुख्यमंत्री यांचेकडे माहे जानेवारी, २०१६ च्या शेवटच्या आठवड्यात दिलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निवेदनाच्या मागणीचे थोडक्यात स्वरुप काय आहे,

(३) तसेच मुंबई व ठाणे परिसराला पाणी पुरवठा करणाऱ्या शहापुर तालुक्यातच तीव्र पाणी टंचाईचा सामना करावा लागत असल्याने येथील नागरिकांच्या पाण्याचा प्रश्न कायमस्वरुपी निकाली काढण्यासाठी लवकर निर्णय घेऊन त्यांची अंमलबजावणी करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) होय, हे खरे आहे.

(२) शहापूर तालुक्यातील पाणी टंचाई दूर करण्यासाठी भावली धरणावरील बहुउद्देशिय प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजनेला मंजूरी मिळणेबाबत.

(३) शहापूर तालुक्यातील टंचाईग्रस्त गावपाड्यांसाठी कायमस्वरुपी उपाययोजना करण्याच्या दृष्टीने, तालुक्यातील जास्तीत जास्त पाडे समाविष्ट करुन योजना तयार करणे, प्रस्तावित होते. त्या अनुषंगाने नाशिक जिल्ह्यातील भावली धरण उद्भव निश्चित करुन ९७ गावे २५९ पाड्यांसाठी गुरुत्वाकर्षणाद्वारे योजनेचे नियोजन जिल्हा परिषदेमार्फत तांत्रिक सल्लागाराची नेमणूक करण्यात आली आहे. सदर सल्लागारामार्फत योजनेचे सर्वेक्षण करण्यात आले असुन योजनेचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यात आला आहे. सदर योजनेस प्रथमत: आवश्यक त्या परवानग्या व पाणी आरक्षण प्राप्त करुन घेण्याबाबत जिल्हा परिषदेस निर्देश देण्यात आले आहेत. सदर परवानग्या व पाणी आरक्षण प्राप्त झाल्यानंतर योजनेस मान्यता देण्याची कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात दुषित व क्षारयुक्त पाण्यामुळे किडनी निकाम असलेल्या रुग्णांचे प्रमाण वाढल्याबाबत

**(९७) * ४९७४६ डॉ.तुषार राठोड (मुखेड), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.राज पुरोहित (कुलाबा), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात दुषीत व क्षारयुक्त पाण्यामुळे किडनी निकामी असलेल्या रुग्णांचे प्रमाण वाढल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच राज्यात २५०० रुग्ण किडनी प्रत्यारोपनाच्या प्रतिक्षेत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त किडनी प्रत्यारोपनासह जंतुससर्ग होऊ नये यासाठी घ्यावयाचे औषधाच्या किंमती वाढल्या असल्याने गरीब रुग्णांना उपचार व किडनी प्रत्यारोपनापासून वंचित राहावे लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, यासंबंधी शासनस्तरावरुन कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत** : (१) हे खरे नाही. मधुमेह, हायब्लडप्रेशर, इन्फेक्शन, कॅन्सर, किडनी स्टोन इत्यादी कारणांमुळेही किडनी निकामी होत असते त्यामुळे केवळ दुषीत व क्षारयुक्त पाण्यामुळे किडनी निकामी असलेल्या रुग्णांचे प्रमाण वाढले असे म्हणता येणार नाही.
(२) आतापर्यंत ३३९० रुग्ण किडनी प्रत्यारोपणाच्या प्रतिक्षेत आहेत.
(३) व (४) हे खरे नाही. शासनाने खाजगी रुग्णालयांमध्ये गरजू व गरीब रुग्णांना किडनी प्रत्यारोपण शस्त्रक्रिया व औषधोपचार करण्याकरिता प्रत्येकी रु.२.५० लाख इतका निधी राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेंतर्गत उपलब्ध केलेला आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अमरावती जिल्हयातील ग्रामपंचायत इमारत बांधकामाकरीता निधी देण्याबाबत

**(९८) * ४८३८७ ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमरावती जिल्हयातील ग्रापंचायत इमारत दुरुस्तीसाठी शासनाकडे १८ कोंटींचा निधी देण्याबाबतचा प्रस्ताव जिल्हा परिषदेने शासनाकडे मंजूरीसाठी पाठविण्यात आल्याचे माहे जाने, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील प्रस्ताव राज्यशासनाने कोणता निर्णय घेतला त्यानुसार सदरील इमारतीच्या दुरुस्तीसाठी आवश्यक निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही. तथापि, अमरावती जिल्हा परिषद यांनी ग्रामपंचायत कार्यालय नसलेल्या ग्रामपंचायतींना ग्रामपंचायत इमारत बांधकामाकरीता विशेष बाब म्हणून रु. १६,६८,००,०००/- इतका निधी उपलब्ध करुन देण्याबाबत दिनांक १८/०२/२०१६ च्या पत्रान्वये प्रस्ताव सादर केलेला आहे.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही. तथापि, चौदाव्या वित्त आयोगाकडून ग्रामपंचायतींना प्राप्त होणाऱ्या निधीतून घ्यावयाच्या कामांमध्ये ग्रामपंचायत भवन बांधकामाची बाब समाविष्ट आहे.

-----------------

**कोल्हापूर जिल्ह्यातील धामणी धरणाचे काम प्रलंबित असल्याबाबत**

**(९९) * ४५७०७ श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी), श्री.चंद्रदीप नरके (करवीर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्ह्यातील धामणी धरणाचे काम सिंचन गैरव्यवहाराच्या चौकशीमुळे तसेच निधी अभावी प्रलंबित असून प्रकल्प खर्च ६५० कोटी पर्यंत वाढला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर धरणाचे काम पुर्ण झाल्यास ३.८५ टीएमसी पाणी अडविण्यात येणार असून १४०० हेक्टर क्षेत्र ओलीताखाली येणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर पाटबंधारे प्रकल्पाचे सुधारित अंदाजपत्रक तयार करुन मान्यता दयावी व घळ भरणीचे काम हाती घेण्यात यावे अशी मागणी लोकप्रतिनिधिंनी दिनांक १६ जुलै, २०१६ रोजीच्या पत्राद्वारे मा.जलसंपदा मंत्री यांचेकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकल्पास निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) नाही.

धामणी धरणाचे काम सिंचन गैरव्यवहाराच्या चौकशीमुळे प्रलंबित नाही. प्रामुख्याने वनक्षेत्राचे संपादनास झालेला विलंब तसेच प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाच्या प्रश्नांमुळे प्रकल्पास विलंब झालेला आहे. प्रकल्पाची अद्यावत किंमत रु.८०६.९० कोटी आहे.

(२) होय.

(३) होय. या आशयाचे निवेदन शासनास प्राप्त झाले आहे.

(४) सन २०१५-१६ करिता सदर प्रकल्पासाठी रु.४.०० कोटीची तरतूद करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**आडगांव (ता.पारोळा, जि.जळगांव) परिसरातील पाणी टंचाईची समस्या सुटण्यासाठी मंजूर केलेला निधी मिळाला नसल्याबाबत**

**(१००) * ३९७८४ श्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आडगाव (ता.पारोळा, जि.जळगाव) परिसरातील पाणी टंचाईची समस्या सुटावी, जमीन ओलिताखाली यावी यासाठी मंजूर झालेला निधी गेल्या ३० वर्षापासून मिळाला नसल्याचे नुकतेच माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निधी न मिळाल्यामुळे पाझर तलावाचे काम रखडलेली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले तदनुसार पाझर तलावाच्या रखडलेली कामे पूर्णात्वास नेण्याकरिता निधीची तरतुद करण्याबाबत शासनस्तरावर काय कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) हे खरे आहे.

जिल्हाधिकारी, जळगाव यांनी पाझर तलाव आडगाव ता.पारोळा हे काम जुन्या रोहयो मधून वगळून जलयुक्त शिवार अभियानातून पुर्ण करण्याबाबत आदेश दिले आहेत.

सदर कामासाठी निधीची तरतूद करणेसाठी सुधारीत अंदाजपत्रक तयार करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## धामणी (ता.राधानगरी, जि.कोल्हापूर) नदीवर शेतकऱ्यांना दरवर्षी उन्हाळयामध्ये मातीचे बंधारे बांधावे लागत असल्याबाबत

**(१०१) * ४६७२७ श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राधानगरी तालुक्यातील धामणी (जि.कोल्हापूर) नदीवर शेतकऱ्यांना दरवर्षी उन्हाळयामध्ये मातीचे बंधारे बांधावे लागतात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बळपवाडी (ता.करवीर) येथे नविन कोल्हापूर पध्दतीचा बंधारा बांधण्याची मागणी मा.जलसंधारण, राज्यमंत्री यांचेकडे करण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शेतकऱ्यांच्या वर्षानुवर्षे पाण्याचा प्रश्न सुटण्यासाठी बळपवाडी येथे बंधारा बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय.

(२) होय, मा.श्री.प्रकाश आनंदराव आबिटकर, विधानसभा सदस्य (राधानगरी भुदरगड- आजरा यांनी त्यांचे पत्र दि. १४/१२/२०१५ अन्वये बळपवाडी येथे का. प. बंधाऱ्याचे काम करण्याबाबत मागणी केलेली आहे.

(३) बळपवाडी, ता. पन्हाळा येथे कोल्हापूर पध्दतीचा बंधारा बांधण्याच्या दृष्टीने, भूस्तर वर्गीकरणाकरिता आवश्यक विंधन विवरे घेण्याचे काम प्रगतीपथावर असून, त्यानुसार अंदाजपत्रकास सक्षम स्तरावर तांत्रिक मान्यता घेऊन सन २०१६-१७ मध्ये सदर काम हाती घेण्याचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रकिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.